**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन   डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१५ गोंदिया | अंक ०२ | बुधवार, दि.१७ ते २३ डिसेंबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## मंत्रिमंडळातील “या’ मंत्र्याचं मंत्रिपद धोक्यात,कोर्टाने दिला खळबळजनक निर्णय

**मुंबई**–राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे पुन्हा एकदा अडचणीत सापडले आहेत. जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांना प्रथम वर्ग न्यायालयाने सुनावलेली शिक्षा कायम ठेवल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे कोकाटे यांचं मंत्रिपद धोक्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

माणिकराव कोकाटे हे याआधी कृषीमंत्री असताना विविध वादांमुळे चर्चेत होते. शेतकरी कर्जमाफीवर केलेली वक्तव्ये आणि विधिमंडळाच्या सभागृहात ऑनलाईन रमी खेळताना दिसल्यामुळे त्यांच्यावर मोठी टीका झाली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचं खाते बदलत कृषी मंत्रालय काढून घेऊन क्रीडामंत्रिपदाची जबाबदारी दिली होती.

मात्र आता कोर्टाच्या निर्णयामुळे त्यांचं संपूर्ण मंत्रिपदच संकटात सापडल्याचं चित्र आहे.शासकीय कोट्यातील १० टक्के आरक्षित



सदनिका गैरव्यवहार प्रकरणात माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षांचा तुरुंगवास आणि १० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा प्रथम वर्ग न्यायालयाने सुनावली होती. या निर्णयाविरोधात कोकाटे यांनी जिल्हा सत्र न्यायालयात अपील दाखल केले होते.

मात्र जिल्हा सत्र न्यायालयानेही ही शिक्षा कायम ठेवली आहे. जिल्हा सत्र न्यायाधीश पी. एम. बदर यांनी हा निकाल दिला. या निर्णयानंतर कायदेशीर अडचणी वाढल्या असून, दोन वर्षांची शिक्षा कायम राहिल्यास लोकप्रतिनिधी कायद्यानुसार त्यांचं आमदारकीसह मंत्रिपदही जाऊ शकतं, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.हे संपूर्ण प्रकरण तब्बल २९ वर्षांपूर्वीचं आहे. १९९५ साली माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी आर्थिक दुर्बल घटकातील असल्याचे भासवून मुख्यमंत्र्यांच्या कोट्यातील १० टक्के आरक्षित सदनिका मिळवल्याचा आरोप आहे. ही सदनिका मिळवण्यासाठी कागदपत्रांमध्ये हेराफेरी केल्याचं पोलिस तपासात समोर आलं होतं.

या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दीर्घकाळ चाललेल्या न्यायप्रक्रियेनंतर आता जिल्हा सत्र न्यायालयाने शिक्षा कायम ठेवल्याने राजकीय परिणामांची चर्चा रंगली आहे. आता माणिकराव कोकाटे पुढे उच्च न्यायालयात दाद मागतात की राजकीय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

## पुरवठा अधिकाऱ्याची एसीबीमार्फत चौकशी करणार-उपमुख्यमंत्री

**नागपूर :–** गोंदिया जिल्ह्यातील सीएमआर तांदूळ जमा करून ठेवल्याप्रकरणी चौकशी करण्यात येईल. तसेच या प्रकरणातील जिल्हा पुरवठा अधिकारी याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. गोंदिया जिल्ह्यातील सीएमआर तांदुळाच्या साठ्याप्रकरणी सदस्य नाना पटोले यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी राज्यमंत्री योगेश कदम यांनी माहिती देताना सांगितले की, सन २०२३–२४ आला. या निर्णयाविरोधात संबंधित राईस मिल मालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतल्याने प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत हा तांदूळ वापरात आणता येणार नाही.

या पार्श्वभूमीवर २९ जुलै २०२५ रोजी मंत्रिस्तरीय बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत तांदळाच्या गुणवत्तेची पुन्हा तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अहवालात तांदूळ मानवी तसेच पशुखाद्यासाठीही अयोग्य असल्याचे स्पष्ट झाले असून, नियमानुसार त्याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया




या वर्षासाठी आवश्यक असलेली एफआरके (एफआरके) पुरवठ्याची गरज पूर्ण करण्यात आली असून, एकूण २ हजार ४३५ मेट्रिक टन एफआरकेची आवश्यकता भागविण्यात आली आहे. सन २०२१–२२ मध्ये केंद्र सरकारच्या पथकाने केलेल्या तपासणीत काही अनियमितता आढळून आली होती. त्यानंतर संबंधित तांदूळ अयोग्य ठरवून तो गोदामात साठविण्यात आला होता. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या तपासणीनंतर तांदूळ योग्य असल्याचा अहवाल देण्यात सुरू करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

राज्यमंत्री कदम म्हणाले की, तालुका व जिल्हा पातळीवरील पुरवठा अधिकाऱ्यांच्या दीर्घकाळ एकाच जिल्ह्यातील नियुक्तीप्रकरणी चौकशी करण्यात येईल. संबंधित अधिकाऱ्यांवर आरोप असताना त्यांना अनेक वर्षे एकाच ठिकाणी ठेवणे योग्य नसल्याचे स्पष्ट करत, अशा अधिकाऱ्यांची योग्य त्या ठिकाणी बदली करण्याची कार्यवाही निश्चितपणे करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## जिल्हा मानव विकास समितीचा माविमला दणका ११ लाख ९० हजार रुपये केले वसूल

### मंजूर निधी खर्च न करणे सहारा लोक संचालित संसाधन केंद्राला भोवले




**गोंदिया :–** जिल्हा मानव विकास समिती कार्यालयाकडून महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे लोक संचालित संसाधन केंद्र सालेकसा यांना मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत मार्च २०२२ मध्ये २१ लाख ४० हजार रुपयांचा निधी देण्यात आला होता. मात्र, लोक संचालित संसाधन केंद्र, सालेकसा यांनी संबंधित निधी मंजूर योजनेवर खर्च केला नसल्याची बाब पाहणी व निरीक्षण अहवालावरून उघड झाली. यानंतर जिल्हा मानव विकास समिती कार्यालयाने अखर्चित निधी शासनाकडे जमा करण्याचे माविमला बजावित दंडासह ११ लाख ९० हजार रुपये वसूल केले.

मानव विकास कार्यक्रम सन २०२१–२२ साठी मत्स्य बीजोत्पादन निर्मिती व विक्री केंद्र योजनेसाठी जिल्हा मानव विकास समिती कार्यालयाने माविममार्फत सहारा लोक संचालित संसाधन केंद्र सालेकसाला २१ लाख ४० हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आला होता. हा निधी मत्स्य बीजोत्पादन निर्मिती व विक्री केंद्राच्या कुंपण, तारजाळी, खांब, सिमेंट, रेती, गिट्टी, मजुरी, तलाव खोलीकरण, शेड बांधकाम, पॉलिथिन, मोटारपंप, पाइप, केबल वायर व इतर इलेक्ट्रिक फिटिंग साहित्य व मजुरी, मत्स्यबीज निर्मितीसाठी ब्रुडर्स, ऑक्सिजन सिलिंडर, पॅकिंग बॅगसह इतर आवश्यक साहित्य खरेदी, मनुष्यबळ,

जागेचे भाडे, वाहन, चालक, शीतकरण पेटी, वजन काटा, मत्स्यविक्री प्रतिनिधीवर मंजूर निधी खर्च करणे अपेक्षित होते. जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) डॉ. रुपेशकुमार राऊत व सांख्यिकी सहायक उत्तम साकोरे यांनी योजनास्थळी भेट दिली असता वरील बहुतांश बाबी व साहित्य योजनास्थळी दिसून आले नाही. तसेच निरीक्षण अहवालातील बाबी जिल्हा मानव विकास अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून दिल्या होत्या.

### अखर्चित निधी केला वसूल

**माविमच्या निधी खर्च अहवालानुसार १ लाख ६५ हजार १३९ रुपये एवढा निधी अखर्चित निदर्शनास आले. तसेच एकजुटीतून अवतरेल असल्याचे माविम योजनेच्या वापरासाठी दिलेले वाहन इतरांना वैयक्तिक करारनाम्यानुसार वापरण्यास दिले. त्यावर झालेला १० लाख २५ हजार ०५१ रुपये इतका निधी दंड स्वरूपात व १ लाख ६५ हजार १३९ रुपये एवढा अखर्चित निधी असे एकूण ११ लाख ९० हजार १९० रुपये शासनास जमा करण्यात यावे, अन्यथा फौजदारी कारवाई करण्याचे माविमला ११ नोव्हेंबर रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे बजावण्यात आले होते.**

### दंडासह अखर्चित रक्कम केली परत

**फौजदारी कारवाईचे पत्र बजावताच माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी यांनी सदर रकमेचा धनादेश ५ डिसेंबर रोजी डॉ. रुपेशकुमार राऊत, जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा मानव विकास समिती यांच्या सुपूदं केला केला आहे. नियोजन विभागाने जिल्ह्यात पहिल्यांदाच अशी दंडात्मक वसुली कारवाई केली. अशी कारवाई प्रथमच करण्यात आली.**

## खेळ व शिक्षणाच्या बळावर आयुष्य घडते -आमदार बडोले




**महागांव:** अटल जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार राजकुमार बडोले यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडले.उद्घाटनप्रसंगी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना आमदार राजकुमार बडोले म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या तालीम, मेहनत आणि आवडीचा योग्य वेळी अभ्यास करून त्या त्या क्षेत्रात कार्यरत व्हावे. संघर्षाच्या काळाशी तडजोड करत आधुनिक युगात उपलब्ध असलेल्या सोयी–सुविधांचा योग्य उपयोग करून शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय व नावलौकिक मिळवावा. मनातील प्रबळ इच्छाशक्तीमुळे कोणतेही कार्य यशस्वीरीत्या पूर्णत्वास जाते. खेळ व शिक्षण या दोन्ही माध्यमांतून आयुष्याला नवी दिशा मिळू शकते असे प्रतिपादन केले.

यावेळी मंचावर जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे, जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती पौर्णिमा ढेंगे, जि.प.सदस्य जयश्री देशमुख,कविता कापगत पंचायत समिती सभापती आम्रपाली डोंगरवार, उपसभापती संदीप कापगते, पंचायत समिती सदस्य घनश्याम धामट,सविता कोडापे, प्रमोद लांडगे,होमराज पुस्तोड नुतन सोनवाने, भाग्यश्री सयाम, कुंदा लोगडे, पुष्पलता दृगकर, रामदास कोहाडकर,विस्तार अधिकारी बी. डब्ल्यू. भानारकर,प्रभाकर कोवे सरपंच,सुरेश पुस्तोडे उपसरपंच ,आर.के.देशमुख, विनोद डोंगरवार, तंटामुक्ती अध्यक्ष शिवरामजी बोरकर, हंसराज गोटेफोडे, भागवत झोडे, लक्ष्मीकांत नाकाडे सरपंच महूरकुडा, नाकुक लसुंते यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आता करदात्यांनो, ५० टक्केच थकबाकी भरा

**गोंदिया:–** राज्य सरकारने ग्रामपंचायत करदात्यांना मोठा दिलासा देत घरपट्टी (मालमत्ता कर), पाणीपट्टी आणि इतर थकीत करांवर ५० टक्के सवलत जाहीर केली आहे. या निर्णयामुळे गावागावातील कर वसुलीला चालना मिळून स्थानिक विकासकामांना आवश्यक निधी उपलब्ध होणार आहे. करदात्याकडे असलेली थकबाकीची अर्धी रक्कम थेट माफ होणार असल्याने गोरगरीब व सामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही योजना ग्रामपंचायतींची कर वसुली वाढवण्यास मदत करेल. पात्र निवासी मालमत्ताधारकांनी १ एप्रिल २०२५ पूर्वीची संपूर्ण थकबाकी एकरकमी भरल्यास त्यांना ५० टक्के सवलत मिळेल. ही सवलत केवळ निवासी मालमत्ताधारकांसाठी आहे. पात्र मालमत्ताधारकांनी चालू वर्षाच्या सन २०२५–२६ कराची संपूर्ण



रक्कम भरून,

१ एप्रिल २०२५ पूर्वीची असलेली थकबाकीची एकूण रक्कम एकाच वेळी भरणे आवश्यक आहे. या योजनेमुळे ग्रामपंचायतींच्या थकीत कराची वसुली वाढेल, ज्यामुळे गावांच्या विकासकामांना चालना मिळेल. थकीत घरपट्टी, पाणीपट्टी व इतर स्थानिक करांवर ५० टक्के सूट, उर्वरित ५० टक्के रक्कम भरल्यावर थकबाकी पूर्णतः निरंक मानली जाईल. थकीत करदात्यांना पुनर्वसनाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. वाढीव वसुलीमुळे ग्रामपंचायतींच्या तिजोरीत अतिरिक्त निधी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज, सार्वजनिक सुविधा यांना गती मिळणार असून, विकासकामांना

**सवलतावरी योजनेमुळे भासामान्या होईल. ग्रामपंचायतींची कर वसुली लक्षणीय वाढून स्थानिक विकासकामांना आवश्यक निधी मिळेल. नागरिकांनी ही संधी त्वरित घेऊन थकबाकीमुक्त व्हावे.**

**- मधुकर वासनिक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि. प. गोंदिया**

प्रशासनाकडून मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्ह्यातील ५४८ ग्राम पंचायतींमध्ये ही योजना लागू असून, लाखो करदाते थकबाकीमुक्त होणार आहेत. ग्रामीण भागातील आर्थिक शिस्त सुधारण्यास मदत होईल. घरपट्टी (मालमत्ता कर), पाणीपट्टी, स्वच्छता कर, विद्युत कर, लायसन्स–वापर शुल्काशी संबंधित थकबाकी यात सवलत मिळणार आहे. ही

योजना अमलात आणण्यासाठी ग्रामसभेत प्रस्ताव ठेवणे आवश्यक आहे. बहुमताने ठराव मंजूर झाल्यानंतरच अंमलबजावणी केली जाईल, ही बाब पारदर्शक व जबाबदार प्रशासनासाठी गरजेची आहे.

५० टक्के सूट फक्त जुन्या थकबाकीवर असून, चालू आर्थिक वर्षांचा कर पूर्णपणे देणे अनिवार्य आहे. नवीन कर भरल्याशिवाय सवलत लागू होणार नाही थकीत मालमत्तेचा प्रकार निवासी असावा, करदात्याने ५० टक्के थकबाकी एकरकमी भरणे आवश्यक आहे. अर्ज–घोषणापत्र जे लागू असेल ते सादर करावयाचे असून, अंतिम मुदत ग्रामपंचायतनुसार नोंदवावी लागणार आहे. ही सवलत निवासी मालमत्तांवर असून, व्यावसायिक मालमत्तांना सवलतीचा लाभ नाही थकीत मालमत्तेचा प्रकार निवासी असावा, करदात्याने ५० टक्के थकबाकी एकरकमी भरणे आवश्यक आहे.

## पदवीधर मतदार संघासाठी मतदार यादी कार्यक्रम घोषित

**गोंदिया:** भारत निवडणूक आयोगाने १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नागपूर विभागातील पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याकरीता कार्यक्रम घोषित केलेला आहे. त्यानुसार प्रारुप मतदार यादयांची प्रसिध्दी ०३ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हास्तरावर, उपविभाग स्तरावर व तालुका स्तरावर करण्यात आलेली आहे.

प्रारुप मतदार यादीवर दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १२ अंतर्गत) १८ डिसेंबर २०२५ पर्यंत उपविभाग व तालुका स्तरावर स्विकारण्यात येणार आहेत. तद्नंतर दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे दिनांक ५ जानेवारी २०२६ व दिनांक १२ जानेवारी २०२६ला मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करण्यात येणार आहे.

## नवरदेव लग्न मंडपात जाण्यापूर्वीच थांबविला बालविवाह

**गोंदिया :–** तिरोडा पोलिस स्टेशन अंतर्गत चांदोरी खुर्द येथे बालविवाह होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर दामिनी पथक व जिल्हा महिला बालविकास प्रकल्प, इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी गोंदिया, तिरोडा पोलिसांनी संयुक्तपणे गावात पोहचून होणारा

बालविवाह नवरदेव लग्न मंडपात पोहोचण्यापूर्वीच थांबविला. ही कारवाई सोमवारी सायंकाळी ७:३० वाजता तिरोडा तालुक्यातील चांदोरी खुर्द येथे करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलिस अधीक्षक अभय डोंगरे आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी

रेश्मा मोरे यांच्या मार्गदर्शनात दामिनी पथक, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन, इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी व तिरोडा पोलिस स्टेशन यांची चमू तयार करून कारवाईची संपूर्ण तयारी केली. त्यापूर्वी विवाहातील बालक व बालिकेचे जन्म प्रमाणपत्र ग्राम सेवक यांच्याकडून प्राप्त करून घेतले.

बालकाचे वय पूर्ण नसल्याचे लक्षात आल्यानंतर चमू चांदोरी खुर्द गावात पोहचली. सायंकाळी ७:३० वाजता विवाहाची संपूर्ण तयारी झालेली होती. लग्न मंडप सजलेला, डेकोरेशन, डीजे, नाच गाणे, जमलेले वहऱ्हाडी, जेवणाची तयारी झालेली होती. काही वेळात लग्न लागणार त्यावेळी दामिनी पथक व महिला बाल विकास विभागाच्या चमूने नवरदेव, नवरी त्यांच्या आई–वडील आणि नातेवाईक यांना चौकशी करून विवाहातील बालकांचे वय कमी असून बालविवाह प्रतिबंधक २००६ च्या कायद्यानुसार वय पूर्ण नसल्याने गुन्ह्यास पात्र आहे.

## डीएचओच्या मानांकनात राज्यात गोंदिया जिल्हा टॉप फाईव्हमध्ये

**गोंदिया :–** दर महिन्याला राज्यस्तरावरून जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांचे विविध आरोग्य कार्यक्रम निर्देशांक उद्दिष्टे पूर्ण केल्यामुळे आरोग्य मानद गुणानुसार रँकिंग केली जात असते. राज्यस्तरावरील माहे ऑक्टोबरच्या आरोग्य निर्देशांक रँकिंगमध्ये डीएचओच्या मानांकनात राज्यात गोंदियाने भरारी घेतली असून गोंदियाने चौथे स्थान पटकावले आहे. आरोग्य विभागाच्या नागपूर परिमंडळात दुसरे स्थान पटकाविले असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी दिली.

माता व बालक आरोग्य, कुटुंब नियोजन, किशोरवयीन आरोग्य, विविध लसीकरण, आरसीएच ऑनलाइन पोर्टल नोंदणी, क्षयरोग कार्यक्रम, आयुष्मान भारत आरोग्यवर्धिनी अंतर्गत मोफत विविध तपासण्या अशा नियमित आरोग्य उपक्रम व राष्ट्रीय आरोग्य उपक्रमांची जिल्ह्याच्या ग्रामीण आरोग्य यंत्रणेने मोफत अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे डीएचओच्या मानांकनात गोंदिया राज्यातल्या




टॉप फाईव्हमध्ये व आरोग्य विभागाच्या नागपूर परिमंडळात दुसरे आले आहे. आरोग्य क्षेत्रात हे मानांकन महत्त्वाचे आणि मानाचे मानले जाते.

जिल्ह्यातील ४५ प्राथमिक आरोग्य केंद्र, ०१नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, २६३ आरोग्य उपकेंद्र, ४ आपला दवाखाना व १७ नागरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांर्तगत सेवा देणाऱ्या जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणेने राष्ट्रीय कुटुंब नियोजन अभियान, विविध लसीकरण मोहिमा, आरोग्य संस्थांमध्ये सुरक्षित प्रसूती, प्रसूतीनंतरचा व अगोदरचा फालोअप, आपत्कालिन काळात १०८ तसेच १०२ रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे, प्रधानमंत्री

### असे आहे टॉप फाईव्हचे मानांकन

**या यादीत ६३.३० गुणांसह धाराशिव पहिल्या स्थानावर, ६२.२७ गुणांसह अकोला दुसऱ्या स्थानावर, ५९.१५ गुणांसह चंद्रपूर तिसऱ्या स्थानावर, ५६.९१ गुणांसह गोंदिया चौथ्या आणि ५६.२५ गुणांसह बुलढाणा पाचव्या क्रमांकावर आहे. पहिल्या पाच टॉपमध्ये येण्यासह जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी आरोग्य विभागाच्या नागपूर परिमंडळात दुसरा क्रमांक पटकावला आहे. चंद्रपूर, नागपूर विभागात पहिल्या स्थानी असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी दिली.**

सुरक्षित मातृवंदन अभियानाची अंमलबजावणी यावरुन राज्य पातळीवर सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे मानांकन केले जाते. या मानांकनात गोंदियाचे जिल्हा आरोग्य प्रशासनाचे कामकाज राज्यातल्या पहिल्या पाचमध्ये म्हणजे चौथ्या स्थानावर आहेत. तर आरोग्य विभागाच्या नागपुर परिमंडळात दुसरे स्थान पटकाविले आहेत.

## हनुमंत कथा कार्यक्रमासाठी उभारलेल्या भव्य मंडपाचे विधिवत पूजन

### दि. २१ ते २३ डिसेंबर दरम्यान कार्यक्रम : प्रफुल पटेल यांच्यातर्फे आयोजन

**गोंदिया :–** खासदार प्रफुल्ल पटेल व वर्षा पटेल यांच्या वतीने स्थानिक धोटे बंधू महाविद्यालयाच्या परिसरात मोठ्या भक्तिभावात दि. २१ ते २३ डिसेंबर दरम्यान भगवान हनुमंत कथा पाठ व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

वृंदावन येथील श्री आनंदम धाम ट्रस्ट, पीठाधिश्वर सद्?गुरु श्री ऋतेश्वरजी महाराज यांच्या अमृत वाणीतून हनुमंत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जय्यत तयारी सुरू आहे. सोमवारी (दि.१५) हजारो धर्मप्रेमींच्या उपस्थिती तिरखेडी (सालेकसा) आश्रमाचे श्रीराम ज्ञानीराम महात्यागी मदराराज यांच्या यांच्या शुभहस्ते माजी आ. राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत मंडप पूजन सोहळा पार पडला. याप्रसंगी माजी आ.



राजेंद्र जैन यांनी कार्यक्रमाची सविस्तर माहिती पत्रकारांना दिली. हे धार्मिक कार्यक्रम शहर व जिल्ह्यातील धरप्रेमीसाठी आहे त्यामुळे जनतेंनी मोठ्या संख्येने उपस्थित रादन दनमंत कथा पाठच्या माध्यमातन

आपले धर्म जीवन साफल्य करावे असे आवाहन केले. दि. २१ डिसेंबर ला दुपारी १.३० वाजता सद्?गुरु श्री ऋतेश्वर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्यशोभा यात्रा माँ जगदंबा दुर्गा मंदिर, दुर्गा चौकपासून श्री हनुमान मंदिर सिव्हिल लाइन येथे समापन होईल. दुपारी ३.३० ते ६ पर्यंत हनुमंत कथाचा आयोजन, रात्री ८ वाजता अखिल भारतीय कवी संमेलनाचे आयोजन धोटे बंध महाविद्यालयात करण्यात आले

आहे. यात देशातील नामवंत व प्रसिद्ध कवी दिनेश बातराजी, कवी चिराग जैन, कवी कविता तिवारी, कवी मनू वैशाली, कवी निकुंज शर्मा यांचा समावेश आहे. दि. २२ डिसेंबरला एन.एम.डी महाविद्यालय येथे दुपारी १२ ते ०२ वाजतापर्यंत विद्यार्थी व युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याकरिता युथ फेस्टिव्हलचे आयोजन व दुपारी ३.३० ते ६ पर्यंत हनुमंत कथा आयोजन, रात्री ८ वाजता खासदार प्रफुल्ल पटेल यांचे निवासस्थान, रामनगर येथे अहमदाबाद येथील प्रसिद्ध श्री धवन मानस द्वारा प्रस्तुत सुंदरकांड चे आयोजन करण्यात आले आहे. दि.२३ डिसेंबरला दुपारी १ ते २ वाजतापर्यंत भक्तगणांना भेट, दुपारी ३.३० ते ६ पर्यंत हनुमंत कथा सायंकाळी ७.३० वाजता कोरणी घाट येथे भव्य धार्मिक व भक्तिमय वातावरणात सद्?गुरु श्री गुरुजी यांच्या हस्ते दीप दान महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व कार्यक्रमांना खासदार प्रफुल्ल पटेल, वर्षा पटेल व भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती माजी आ. राजेंद्र जैन यांनी दिली.

## संपादकीय

# हिवाळी अधिवेशन विदर्भाकरीता फसवे निघाले...

हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले मात्र विदर्भाच्या वाट्याला काय आले हा प्रश्न अद्यापही अनुत्तरीतच आहे. विदर्भाच्या वाट्याच्या अधिवेशनात मुंबईसाठी सर्वाधिक घोषणा होत्या असा आरोप विरोधक करतायत,तर विदर्भ मराठवाड्याचा अनुशेष भरुन काढत असल्याची आकडेवारी सरकार पुढे करतंय. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मुंबई राजधानी बनली तेव्हा नागपूर विदर्भावर अन्याय झाल्याची भावना येऊ नये म्हणून हिवाळी अधिवेशन नागपूरला घेतलं जातं. या अधिवेशनावर १०० कोटींपेक्षा जास्त खर्च केला जातो, इथे विदर्भाच्या विकासाची चर्चा होणं अपेक्षित असतं

विदर्भातील धान,सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी या अधिवेशनाकडे डोळे लावून बसला होता. धानाला आणि सोयाबीनला बोनसची घोषणा होईल या नजरेने शेतकरी बघत होता,मात्र सरकारने याकडे कानाडोळा केल्याचे दिसून आले.कापूस खरेदीचे केंद्र वाढवा ही मागणी केली पण त्याचा ही निर्णय झाला नाही. पैसे नाही खिशात पण घोषणा मात्र अपार अशी अवस्था महायुती सरकारची आहे.

मुख्यमंत्र्यांनी राज्यात गुंतवणूक येते, सामंजस्य करार झाले, याबाबत सभागृहाला माहिती दिली. पण ज्यांच्याबरोबर करार झाले त्या कंपन्या राज्यात येत नाही, प्रत्यक्षात गुंतवणूकच झालेली नाही. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटलेला नाही, अशी टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केली. विरोधी पक्षाने राज्यातील कायदा–सुव्यवस्था बाबत प्रश्न उपस्थित केले त्यावर ठोस उत्तर मिळाले नाही. त्यामुळे सात दिवसांत जनतेच्या पदरी निराशाच आली, अशी टीका जयंत पाटील यांनी केली.

प्रयत्न करूनही काही प्रश्न जेव्हां सुटत नाहीत, तेव्हां त्यावर तात्पुरती उपाययोजना करून प्रश्न बाजूला सारावा लागतो. तात्पुरत्या उपाययोजना सुरू असतात, त्यातून बऱ्याचदा प्रश्नाची दखल घेतल्याचा दिलासाही मिळतो, पण मूळ जखम तशीच भळभळत राहते. तिचं दुःख कमी होत नाही. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न नेमका असाच झाला आहे. आत्महत्या थांबत नाहीत, त्यांची तीव्रताही कमी होत नाही. उपाययोजना म्हणून पॅकेज, व्यक्तिगत आर्थिक मदत, उत्तम बियाणं, खतांत सवलत–असं बरंच काही केलं गेलं. अडचणीतल्या शेतकऱ्याच्या मानसिक आधारासाठी तज्ज्ञांना घेऊन काही प्रयोगही केले गेले. बीड जिल्ह्यात ‘मानवलोक’सारख्या संस्थेने ‘आशाताई’सारख्या समुपदेशिका घडवल्या. प्रयोग यशस्वी झाले. काही आत्महत्या रोखल्या गेल्याही. पण, त्याने एकूण आत्महत्यांच्या प्रमाणात घट झाल्याचं दिसलं नाही. वेगवेगळ्या उपायांनंतरही त्यात फारसा फरक नाही. नागपूरला सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात गुरुवारी विधान परिषदेत सरकारकडून जी आकडेवारी दिली गेली, ती याचीच पुष्टी करणारी आहे. गेल्या नऊ महिन्यांत राज्यात ७८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सर्वात जास्त आत्महत्या विदर्भात, नागपूर विभागात(२९६) असून त्यानंतर मराठवाडा (२१२) आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवालात प्रसिद्ध झालेली आकडेवारी पाहिली, तर देशात शेतकऱ्यांच्या जितक्या आत्महत्या झाल्या, त्यातल्या ५० टक्के एकट्या महाराष्ट्रात आहेत. राज्यात एकूण ६ हजार ६६९ आत्महत्यांची नोंद आहे. त्यातल्या ४ हजार १५० आत्महत्या जमीन मालक शेतकऱ्यांच्या, तर २ हजार ५१९ भूमिहीन शेतमजुरांच्या आहेत. गेल्या चाळीसेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या ठळकपणे चर्चेत असून त्यात सुरुवातीपासूनच विदर्भ आणि मराठवाडा आघाडीवर आहे. विदर्भ–मराठवाड्यातील या दुःस्थितीच्या कारणांचा विविध अंगांनी अभ्यास केला गेला. त्यात शेतीतील अडचणींबरोबरच अन्य कौटुंबिक, सामाजिक कारणं–दबाव, चालीरीती यांचाही विचार झाला. त्यांचे निष्कर्ष आपल्यासमोर आहेत. ते सर्वमान्यही आहेत. पण, त्यातल्या एकेका कारणाला लक्ष्य करून त्यासाठी प्रबोधनात्मक कामाला म्हणावा तसा जोर लागल्याचं दिसत नाही. सरकारच्या औपचारिक यंत्रणांकडून यावर इलाज होईल, असं वाटत नाही.

शेतीतल्या अडचणींचा विचार करताना पूर्वी शेतमालाच्या बाजारभावाचा विषय सर्वप्रथम समोर यायचा. काही शेतमालांचे भाव आधारभूत किमतीच्या टेकूने सरकारला विशिष्ट पातळीवर सांभाळता येतात. पण, भाजीपाला किंवा फळांसारख्या नाशवंत मालासाठी हे शक्य होत नाही. ज्या मालाला आधारभूत किमतीचा थोडाबहुत उपाय आहे, तिथेही मालाचा अपेक्षित दर्जा आणि यंत्रणेतल्या गैरव्यवहारांचे अडथळे आहेतच. त्यामुळे, जिथे बाजारभावाची शाश्वती देता येत नाही, तिथे शेतीतील गुंतवणुकीचा खर्च कमी करण्यासाठी मदत देऊन झाली. पण, त्याचाही काही उपयोग झालेला दिसत नाही. मानवनिर्मित कारणं दूर करण्याचा किंवा बाजार व्यवस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या समस्यांना उत्तरं शोधण्याचा प्रयत्न गेली अनेक वर्षं सुरू असूनही त्याला यश येत नसताना आता माणसाच्या नियंत्रणापलीकडच्या बाबींची शेतीवर आक्रमणं सुरू झाली आहेत. गेली काही वर्षं महाराष्ट्राला एकाच वेळी दुष्काळ आणि अतिवृष्टी या दोन्ही नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावं लागतं आहे. वातावरणीय बदलांचा हा परिणाम आहे. जगात ज्या देशांना वातावरणीय बदलांच्या दुष्परिणामांना सामोरं जावं लागतं आहे, त्यात भारत नवव्या क्रमांकावर आहे! गेली काही वर्षं हिमालयापासून केरळपर्यंत आणि पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत ढगफुटी, चक्रीवादळांचा रतीब सुरू आहे. किनारपट्टीवरच्या शेतीबरोबरच मच्छीमारांचं मोठं नुकसान होतं आहे. जगातल्या तीन अब्जांपेक्षा जास्त लोकसंख्या (सुमारे ४० टक्के) गेली ३० वर्षं तीव्र वातावरणीय बदलांनी वारंवार उद्ध्वस्त होते आहे. ही लोकसंख्या ज्या अकरा देशांत आहे, त्यातच भारत नववा आहे. कृषीप्रधान भारताला या अस्थिर वातावरणाचा विचार करून आपल्या कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल करावे लागणार आहेत. त्याची जाणीव आपल्याकडे आता दिसू लागली आहेत. धोरणात्मक पातळीवर त्याच्या पर्यायांची भाषा बोलली जाऊ लागली आहे. केवळ चर्चेत न ठेवता याबाबतच्या उपाययोजना लवकर प्रत्यक्ष आणल्या नाहीत, तर येत्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा भयावह होण्याची भीती आहे.

महाराष्ट्रातल्या शेतीवर आणखी एक गंभीर संकट आलं आहे. ते आहे, वन्य प्राण्यांचं. चर्चा जरी हिंस्र प्राण्यांची होत असली, तरी खरं संकट वन्य प्राण्यांचंच आहे. त्याची जाणीव अजून महाराष्ट्राला तितकीशी दिसत नाही. कोकण आणि गडचिरोलीत हत्ती; रानडुक्करं, माकडं, हरणं, निलगाई शेतीचं मोठं नुकसान करत आहेत. कोल्हे, लांडगे, मुंगूस, साळींदरं गावागावांत सर्रास दिसू लागली आहेत. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हरणं, काळवीटं, सांबरांनी शेतीची वाट लावली आहे. मोर, उंदीर, अस्वलं, पक्षांचे थवे राज्याच्या वेगवेगळ्या भागांत शेतात हैदोस घालत आहेत. या सगळ्याच्या परिणामी यानंतर विशिष्ट कीटक, किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. चर्चा फक्त बिबट्यांची आहे. पण जंगलं साफ केल्यामुळे ही सगळी वन्य मंडळी शेतात उतरली आहेत. त्यांनीही शेतकरी कावला आहे. उद्याच्या आत्महत्यांना ही नवी कारणंही कारणीभूत ठरतील, इतकी ती गंभीर आहेत. उद्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्याची गांभीर्याने आजच दखल घेतली पाहिजे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# समतेचा सत्याचा लढा पुढे न्यावा डॉ.बाबा आढाव यांना अभिवादन

नागपूर (दि.१३डिसे) समतेचा सत्याचा जातीअंताचा लढा जोरकसपणे पुढे न्यावा लागेल. हीच खरी डॉ. बाबा आढाव यांना आदरांजली ठरेल. महात्मा जोतीराव फुले यांचा जातीव्यवस्थेविरुद्धचा लढा, सामाजिक न्यायाचा लढा महत्वाचा. असंघटित कष्टकरी समाजाचे प्रश्न घेऊन लढताना डॉ. बाबा आढाव सत्यशोधक समाजाच्या भूमिकेला मध्यवर्ती ठेवून काम करत होते, विषमता निर्मुलनाचे काम करत होते, असे मनोगत नागेश चौधरी यांनी व्यक्त केले. ते अभिवादन सभेत अध्यक्ष स्थानावरून व्यक्त झाले.

कष्टकऱ्यांचे आधारवड, सत्यशोधक डॉ.बाबा आढाव अभिवादन सभा, सेवादल महिला महाविद्यालय उमरेड रोड नागपूर येथे आयोजित केली होती. या सभेला आरती अनिल देशमुख(आढाव), शेतकरी संघटनेचे विजय जावंधिया, राष्ट्रीय कष्टकरी पंचायतचे डॉ. हरीश धुरट, सेवादल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय शेंडे प्रामुख्याने विचारपीठावर हजर होते. संचालन सत्यशोधक चळवळीचे बाबा बिडकर यांनी केले. यावेळी जिल्हा परिषद नागपूरचे जि. प. सदस्य सलील देशमुख हजर होते.आयोजन विजय बाभूळकर यांनी केले होते.

विजय जावंधिया यांनी शेतकरी, कष्टकऱ्यांची ही चळवळ बाबांच्या विचाराचा गाभा होता. बाबांनी मला पुणे येथे म.फुले वाड्यामध्ये बोलायला बोलवले होते, तेव्हाच माझा त्यांचा परिचय झाला असल्याचे नमूद केले. त्यांची चळवळ सर्व मिळून पुढे नेऊ, असेही ते म्हणाले. यावेळी डॉ. हरीश धुरट म्हणाले, बाबांनी हमाल माथाडी कामगारांची चळवळ मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान व दिल्ली येथे पोहचवली होती. त्यांनी कष्टकरी माणसाला गरीबीच्या खाईत लोटल्या जात असल्याचे जोरकसपणे मांडले होते. म्हणून त्याविरुद्ध कष्टकऱ्यांचा लढा उभा करण्याचे काम बाबांनी केले. माथाडी कायदा पातळ करण्याचे सुतक महाराष्ट्र सरकारने केले आहे. त्यामुळे समतेची लढाई सर्व मिळून केली तरच डॉ बाबांना अभिवादन, आदरांजली ठरेल. आपण सर्वांनी डॉ बाबांनी चालविलेला लढा पुढे नेण्याचे आवाहनही डॉ . धुरट यांनी केले. डॉ. अशोक चोपडे यांनी डॉ. बाबा आढाव यांच्या एकूणच असंघटित क्षेत्रातील कष्टकरी शेतकरी समाजाच्या प्रश्नांवर लढण्याची पद्धत वरवर आर्थिक दिसत असली तरी, एक मत समान पत, एक गाव एक पाणवठा, हे अभियान चालवताना बाबा सामाजिक समतेचा, प्रतिष्ठेचा, सांस्कृतिक मुल्यांचा विचार करायचे हे स्पष्ट करुन सांगितले. महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळीचे काम ही बाबांची मुख्य प्रेरणा असल्याचे त्यांच्या आंदोलनातून पुढे येते हे अनेक उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केले.



अभिवादन सभेत नागपूर येथील विविध पक्षांचे, संघटनांचे मान्यवर, सत्यशोधक समतावादी संघटनांचे प्रतिनिधी इत्यादी विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी आपापल्या आठवणींना जागे केले. यावेळी आरती देशमुख, संजय शेंडे, विलास भोंगाडे, डॉ. अशोक चोपडे,बाबा बिडकर, आशु सक्सेना, ज्ञानेश्वर रक्षक,वंदना वनकर, अनुज हुलके, हेमराज माले, इत्यादी अनेक मान्यवरांनी बाबांचा वसा पुढे नेण्याचे अभिवचन दिले. विविध संघटनांच्या वतीने दिनांक १३ डिसेंबरला झालेल्या या आदरांजली सभेत क्रांतीगिते आणि महात्मा फुले रचित अखंड गायनातून बाबांचे स्मरण करण्यात आले. कष्टकरी चळवळींची क्रांतीगिते रोशनी, सुजाता, प्रियंका, हर्षल, मोना, सुदर्शना,श्रुदेवी, आरती, वैशाली यांनी सादर केली. मान्यवरांनी डॉ बाबा आढाव यांच्या एकंदरीत जीवनप्रवासावर प्रकाश टाकला.याप्रसंगी विविध सामाजिक संघटनेच्या प्रतिनिधींनी बाबा आढावांना आदरांजली अर्पण केली. धरणग्रस्तांसाठी काम करणारे मा.विलास भोंगाडे , सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक डॉ.अशोक चोपडे, महाराष्ट्र अं नि स चे जगजीत सिंग, कर्पूरी ठाकूर मंचचे डॉ.संजय शेंडे, एसयुसीआय,(कम्युनिस्ट)चे शैलेश जनबंधू, सत्यशोधक डॉ बाबा आढाव अभिवादन समितीचे संयोजक विजय बाभूळकर,सत्यशोधक महिला संघटनेच्या वंदना वनकर, गुरुदेव सेवा मंडळाचे ज्ञानेश्वर रक्षक, महिला संघटनेच्या आशू सक्सेना, विद्रोहीचे टेमराज माले, कर्णबोधी सत्यशोधक शिक्षक प्रबोधिनीचे अनुज हुलके,सीपीआय एम एल लिबरेशनचे विप्लव मेश्राम, सीपीआय एम एल रेड स्टारचे बंडू मेश्राम,ओबीसी कर्मचारी संघटनेचे राजू बोचरे, ॲड एकनाथ बावनकर, संविधान जागर अभियानचे स्वप्निल फुसे,इंटकचे मुकुंद मुळे, फोटोजर्नालिस्ट नानु नेवरे, इत्यादींनी आपापल्या संघटनेच्या वतीने आदरांजली अर्पण केली. डॉ यशवंत मनोहर यांनी पाठवलेल्या शोकसंदेशाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला बहुजन संघर्ष समितीचे दिवाकर वर्षे, कुमुद वर्षे, मिरा मदनकर,सुरेश बोरकर,प्रमोद मुन, कल्पना मून, शुभांगी मेश्राम, कर्मवीर बाबुराव आवळे प्रतिष्ठानचे विनायक जामगडे, त्रिरत्न बौद्ध महासभेचे नरेन मून, सत्यशोधक समाजाचे सुरेश कुथे, प्रदीप शेंडे, संजय नरखेडकर, नामदेव हटवार, राम काळे ,कामगार चळवळीचे कल्याण हिरेखन, प्रा. रमेश पिसे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण जीवनात सामाजिक चळवळ जगणारे, कष्टकरी समाजातील विविध घटकांना संघटित करून त्यांना हक्कासाठी उभे करणारे महाराष्ट्रातील एक आगळ्यावेगळ्या प्रकारचे व्यक्तिमत्व होते. सर्वांचा आधारवड होते. महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले यांच्या स्त्रीशूद्रातिशूद्राच्या लढ्याचा धागा पकडून ते काम पुढे नेले. विशेषतः महात्मा फुलेंचे साहित्य प्रकाशित करणे आणि सत्यशोधक समाजाचे कार्य नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी सत्यशोधकांनी निर्माण केलेले साहित्य प्रकाशित करणे, महात्मा फुले समग्र वाययाची निर्मिती करणे यासाठी विविध ठिकाणी फिरुन महात्मा फुलेंचे, सत्यशोधक चळवळीचे वायय गोळा करून अत्यंत मोलाची कामगिरी केली.

जातीअंताच्या ध्येयासाठी जातीच्या प्रश्नावर विविध पातळीवर जात प्रश्नाचे वास्तव मांडणी करण्यासाठी त्यांनी एक गाव एक पाणवठा चळवळ राबवली. तर एक मत समान पत ही चळवळ राबवून समाजातील लोकशाही मूल्य मोठ्या प्रमाणामध्ये रुजवण्याच काम केलं. संविधानिक मुल्यांना अनुसरून या देशातील सामाजिक राजकीय वास्तव लक्षात घेतले पाहिजे. घटनेनुसार त्याचे हक्क मिळाले पाहिजे. राजकीय व्यवस्थेमध्ये झालेले बदल आणि बेबंदशाहीतून घटनाबाह्य राजकीय वाटचाल यावर सुद्धा त्यांनी मोठे काम करण्याची आवश्यकता असताना इव्हीएम विरोधात आंदोलन, आत्मक्लेश आंदोलन केलेले आहे.

या देशामध्ये हजारो वर्षांपासून विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या संघटनांच्या लोकहितविरोधी कृत्यांना उघडे पाडत बाबांनी वेळोवेळी आसूड ओढले. जयपुर हायकोर्ट समोर मनूचा पुतळा उभा करण्यात आला होता, त्याविरुद्ध त्यांनी आंदोलन करून मनूचा पुतळा हटवण्यासाठी मोठे प्रयत्न केले. या देशातील शेतकरी, कष्टकरी स्त्रिया मोलकरणी, हमाल माथाडी, कचरा –काच गोळा करणारे,रिक्षाचालक असे बहुजन समाजातील कष्ट करणारे लोक एकत्रित करून त्यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांच्या श्रमाचे मूल्य समाजाला समजले पाहिजे, श्रममूल्य रुजले पाहिजेत यासाठी ते झटत राहिले. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा ध्यास घेऊन, महात्मा फुलेंनी त्यांच्या काळामध्ये जे काम केले ते पुढे नेण्याचं काम केलं. स्त्रीशूद्रातिशूद्रांना समानतेने वागणूक मिळाली पाहिजे यासाठी ते झटत राहिले. या प्रसंगी सर्व मान्यवरांनी महात्मा फुलेंच्या कार्यावर चालणाऱ्या डॉक्टर बाबा आढाव यांच्या कार्याचा एकंदरीत आढावा घेऊन स्मरण केले. आणि त्यांना आदरांजली अर्पण केली.

# २० व २१ डिसेंबर रोजी चंद्रपुर येथे तिसरे राष्ट्रीय जय भीम साहित्य संमेलन

## सेवानिवृत्त सनदी अधिकारी श्याम तागडे यांच्याहस्ते होणार उद्घाटन

**चंद्रपुरः**–मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई तसेच लोकजागृती नाट्य कला, क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक संस्था, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय तिसरे राष्ट्रीय ‘जय भीम’साहित्य २० व २१ डिसेंबर रोजी प्रियदर्शनी इंदिरा गांधी नाट्य सभागृह चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

पहिले व दुसरे राष्ट्रीय ‘जय भीम’ साहित्य संमेलन अत्यंत उत्साहात पार पडले होते. पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब कसबे तर दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे होते. या दोन्ही संमेलनांना रसिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. तिसऱ्या संमेलनाची जय्यत तयारी सुरू असून संमेलनाचे मुख्य संयोजक डॉ. अनिरुद्ध वनकर व त्यांची चमू कार्यरत आहे.

संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे २० डिसेबर रोजी सायंकाळी ४ वाजता चंद्रपूर बसस्थानक ते प्रियदर्शनी इंदिरा गांधी नाट्य सभागृहापर्यंत लोककलावंत, विद्यार्थी, लेखक, साहित्यिक व नागरिकांच्या सहभागाने ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे.

उभागृहकाल्न संमेलनाचे उद्घाटन सायंकाळी ५.३० वाजता सेवानिवृत्त अधिकारी माजी अपर मुख्य सचिव तथा प्रज्ञा मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम तागडे यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व कादंबरीकार लक्ष्मण गायकवाड हे भूषविणार आहेत. संमेलनाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबईचे डॉ. प्रदीप ढवळ, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे, पत्रकार देवेंद्र गावंडे, प्रा. डॉ. इसादास भडके, प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर, डॉ. राजेश दहेगावकर व ज्येष्ठ साहित्यिक रोहित जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

सायंकाळी ७ वाजता ज्येष्ठ कवी–नाटककार इ. मो. नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होणार असून युवराज गंगाराम, शालिक जिल्हेकर, हृदय चक्रधर, हेमंत



बारसागडे, मनोहर गजभिये, खेमराज भोयर व रमेश बुरबुरे हे कवी सहभागी होणार आहेत. रात्री ८ वाजता प्रा. डॉ. संगीता टेकाळे यांचे ‘ममी रमाई बोलते’ हे एकपात्री नाटक सादर होणार आहे. रात्री ८.३० वाजता नागपूर विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. शैलेंद्र

लेंडे यांच्या अध्यक्षतेखाली ‘दलित साहित्य प्रवाहात कादंबरी का फुलली नाही?’ या विषयावर परिसंवाद होणार असून यात अशोक पवार, प्रा. डॉ. धनराज खानोरकर, प्रा. रवी कांबळे व प्रा. डॉ. शुभांगी पाटील सहभागी होणार आहेत.

रात्री ९.३० वाजता ज्येष्ठ गायक मनोज राजा, कोमल धांडे, नेहा गाडे व धम्मज्योती तिगोटे यांचा ‘जय भीम जलसा’ सादर होणार आहे. २१ डिसेंबर रोजी दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५ वाजता कथाकथन, कवी संमेलन व मराठी गझल संमेलन होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता प्रा. डॉ. इसादास भड़के यांच्या अध्यक्षतेखाली समकालीन मराठी साहित्य आणि जात वास्तव या विषयावर परिसंवाद होणार असून यात प्रा. डॉ. अनमोल शेंडे, डॉ. विद्याधर बनसोड, डॉ. संजय लाटेलवार, प्रा. अविनाश पोईनकर, व डॉ. राज मुसने सहभागी होणार आहेत.

सायंकाळी ७.३० वाजता ‘जय भीम रत्न पुरस्कार’ वितरण व समारोप समारंभ होणार आहे. सदर कार्यक्रमाला लक्ष्मण गायकवाड, प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे, गोंदवना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन, उपयुक्त सिद्धार्थ गायकवाड, बापूसाहेब गजभारे, ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत, पत्रकार प्रमोद काळबांडे व सहाय्यक संचालक ललित खोब्रागडे यांची उपस्थिती लाभणार आहे.

# शारीरीक तंदुरुस्तीसाठी कब्बडी सामने आवश्यक-लायकराम भेंडारकर



**अर्जुनी मोरगावः–** सध्या आपल्या ग्रामीण भागामधे विशेष करून गोंदिया जिल्ह्यात शालेय अटल क्रीडा सांस्कृतिक महोत्सव सुरु असुन केंद्र, तालुका, व जिल्हास्तरीय महोत्सव सुरु असुन या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळते. तसेच आमच्या परिसरात सध्या युवा व प्रौढ कब्बडी सामने गावागावात सुरु आहेत. यामुळे गावात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आहे. कब्बडी सामने हे शारीरीक तंदुरीस्तीसाठी महत्वाचे असल्याचे प्रतिपादन गोंदिया जि. प. चे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

तालुक्यातील पिंपळगाव/खांबी येथे ग्रामस्थांच्या पुढाकारातून भव्य रात्रकालीन कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी भेडारकर बोलत होते. या कार्यक्रमास पंचायत समितीचे उपसभापती संदीप कापगते, सरपंच

विलास फुडे, उपसरपंच निरुता शेंडे, गौरीशंकर ब्राह्मणकर, विलास लंजे, तंटामुक्ती अध्यक्ष दादाजी ब्राह्मणकर, माजी पोलीस पाटील लक्ष्मण ब्राह्मणकर, अशोक राऊत, तारेश डोंगरे, नीताराम सोनवाने यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देत कबड्डी सारख्या पारंपरिक खेळामुळे युवकांमध्ये शिस्त, संघभावनाव शारीरिक तंदुरुस्ती वाढते, असे मत व्यक्त केले. या रात्रकालीन स्पर्धेमुळे गावात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून युवकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळत आहे. या स्पर्धेसाठी गावातील खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेला भरभरून प्रतिसाद देत आहेत. आयोजकांनी केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

# कायम ऋणात राहूया...

सैनिकाचे जीवन हे हातावर मृत्यू लिहून आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी स्वतः निवडलेले असते. यासाठी शौर्य, धैर्य आणि देशासाठी काही करण्याची वृत्ती असावी लागते. जे नागरिक प्रत्यक्ष सीमेवर जाऊन लढू शकत नाही ते विविध मार्गानेही देशसेवा करू शकतात. यातील प्रत्यक्ष सैनिकांना मदत करण्यासाठीचा मार्ग म्हणजे ‘ध्वजदिन निधी’ हा आहे. या निधीच्या माध्यमातून सैनिकांना, शहीद सैनिकांना, त्यांच्या कुटुंबियांना आपल्या रोजी रोटीतून छोटासा का होईना पण खारिचा वाटा देता येतो आणि सैनिक न होताही देशासाठी काही करता येऊ शकतं.

भारत पारतंत्र्यात होता त्यावेळी भारतीय म्हणून भारतीय उपखंडातील सैनिकांनी पहिल्या महायुद्धात आणि दुसऱ्या महायुद्धात भाग घेतला होता. त्यात अनेक भारतीय सैनिक जखमी शहीद झाले होते, त्यांच्यासाठी काहीतरी तत्कालीन सरकारने करावे म्हणून ७ डिसेंबर १९१९ रोजी भारतीय सैनिक बोर्डाची स्थापना करण्यात आली. त्यामुळे ‘७ डिसेंबर’ हा दिवस दरवर्षी ‘सशस्त्र सेना ध्वजदिन’म्हणून पाळला जातो. या दिवसापासून ध्वनिधी संकलनाची सुरुवात करण्यात येते.

देशातील सर्वोच्च पदावर असणारे राष्ट्रपती, प्रधानमंत्री, राज्याचे मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजदिन निधी देण्याचा पायंडा पडला आहे. नुकताच गोंदिया जिल्ह्यात जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘ध्वजदिन निधी’ संकलनाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमात त्यांनी जिल्ह्यातील माजी सैनिकांचे, त्यांच्या कुटुंबीयांच्या काहीही अडचणी असल्यास त्या सोडविण्याचा प्रयत्न करण्याची वचनबद्धता दर्शविली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पायदळ सेना, नौसेना व वायुसेना यांचा वाढता खर्च लक्षात घेऊन नौसेना, वायुसेना व पायदळसेना, निवृत्त सैनिक तसेच अवलंबित यांच्यासाठी एक संस्था असावी या उद्देशाने १९४४ मध्ये भारतीय सैनिक बोर्डाचे पुनर्गठन करण्यात आले आणि त्याला भारतीय सैनिक नौसैनिक वायुसैनिक बोर्ड असे नाव देण्यात आले. १९७५ मध्ये पुन्हा नाव बदलून जिल्हा सैनिक बोर्ड व अंतिमतः १९८२ मध्ये जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय असे नाव देण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय असतेच. लेफ्टनंट पदावरील निवृत्त झालेला व्यक्ती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी म्हणून कार्यरत असतो अथवा तसे नसल्यास सक्षम पदावरील व्यक्तींकडे याचा अतिरिक्त कार्यभार दिला जातो.

१ मे १९९९ रोजी भंडारा जिल्ह्यातून गोंदिया हा जिल्हा वेगळा झाला असून एक जानेवारी २००६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा सैनिक कल्याण कक्षाची स्वतंत्र सुरुवात झाली.



तेव्हापासूनच्या आकडेवारीनुसार गोंदिया जिल्ह्यात १२२० माजी सैनिक आहेत. विधवा १९५, युद्धामध्ये शहीद झालेल्या सैनिकांच्या पत्नी वीर नारी ०६ तर वीर माता ०२ आणि त्यांचे एकूण अवलंबित ४२४५ आहेत.

माजी सैनिकांच्या तसेच सेवार्थ सैनिकांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांना निवृत्तीवेतन मिळावे यासाठी गोंदिया जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय कार्यरत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या नोकरीमध्ये १५ टक्के आरक्षणाची कार्यवाही करून माजी सैनिकांना रोजगार देण्याचा प्रयत्न होत असतो. शालेय व महाविद्यालय शिक्षण, व्यावसायिक शिक्षणाकरिता आर्थिक मदत दिली जाते तसेच दहावी पास नंतर ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत शिष्यवृत्ती महाराष्ट्र शासनाद्वारे केंद्र शासनाद्वारे पीएम स्कॉलरशिप प्रदान केली जाते. माजी सैनिकांच्या पाल्यांना महाविद्यालयांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये ५ टक्के आरक्षित जागेवर प्रवेश दिला जातो. सैनिक निवृत्त झाल्यानंतर त्यांना माजी सैनिक अंशदान स्वास्थ योजनाचे सदस्य बनविण्याकरिता प्रवृत्त करण्यात येते व माजी सैनिक जननिवृत्ती वेतन मिळत नाही व ईसीएचएसचे सदस्य नाहीत त्यांना वैद्यकीय मदत प्रदान केली जाते.

जिल्हा पोलीस अधीक्षक व अप्पर जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार यांच्या संपर्कात राहून माजी सैनिकांच्या विविध प्रकारच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. आतापर्यंत जिल्ह्यातील ३६४ माजी सैनिकांना कार्यालयाच्या अधिपत्याखाली रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. ही कामगिरी उत्कृष्ट नाही पण खारीचा वाटा निश्चितच आहे.

दरवर्षी शासनाकडून ध्वज निधी गोळा करण्यासंदर्भात उद्दिष्ट प्राप्त झालेले असते त्याप्रमाणे उद्दिष्टाची पूर्ती करण्याचा प्रयत्न जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्याकडून करण्यात येतो. वर्ष २०२३ मध्ये शासनाकडून ३३ लाख ४५ हजार उद्दिष्ट प्राप्त झाले होते, मात्र जिल्ह्याने चांगली कामगिरी करत ३४ लाख ४२ हजार ४०० रुपये गोळा केले. याची टक्केवारी १०२.९१ % इतकी होती.

२०२४ मध्ये शासनाकडून ३७ लाखांचे उद्दिष्ट प्राप्त झालेले असून एकूण गोंदिया जिल्ह्याने ३३ लाख ९१ हजार म्हणजे ९१.६५% रक्कम जमा केलेली आहे. निश्चितच २०२३ च्या तुलनेत यात थोडे अंतर आहे. मात्र यावर्षीसाठी ध्वजदिन निधीचे उद्दिष्ट ३७ लाख रुपये मिळालेले आहे, हे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न आपल्या सर्वांच्या सहकार्याने करण्यात येईल. कल्याणकारी निधीतून वर्ष २०२५ ते २०२६ (नोव्हेंबर २०२५ पर्यंत) या कालावधीत एकूण ८० लाभार्थ्यांना १६ लाख ८ हजार २८८ रुपयाचे वाटप करण्यात आलेले आहे.

या अंतर्गत औषध उपचारासाठी सात सैनिकांना १ लाख ६८ हजार, चरितार्थसाठी ३ सैनिकांना १५०००, व्यवसायिक शिक्षण यासाठी ४० माजी सैनिकांना ९ लाख ७८ हजार ७९८ शिष्यवृत्तीसाठी, १२ माजी सैनिकांना ६० हजार ५००, अंत्यविधीसाठी ६ माजी सैनिकांना ६०,००० रुपये, शहीद सैनिकांच्या अवलंबितांना ०१ माजी सैनिकाच्या कुटुंबाला ७५ हजार रुपये, घर बांधणी सदनिका खरेदीसाठी ०२ माजी सैनिकांना ०१ लाख रुपये आणि इतर अनुषंगिक खर्चासाठी २० माजी सैनिकांना १ लाख ५० हजार ९९० रुपये, असे एकूण १६ लाख ८ हजार २८८ रुपये देण्यात आलेले आहे. ही मदत करताना एकप्रकारे ऋणातून मुक्त होणे असेही म्हणू शकतो.

६ सप्टेंबर २०२३ रोजी शहीद सैनिक सुरेश हुकलाल नागपुरे यांच्या अवलंबितांना महाराष्ट्र शासनाकडून निर्गमीत केलेले एक कोटी रुपयांचे अनुदान कार्यालयास प्राप्त झाले असून येत्या काही महिन्यात सर्व कागदोपत्री कार्यवाही करून शहीद झालेल्या सैनिकाच्या कुटुंबास हा निधी वितरित करण्यात येईल.

शासनाने शहीद सैनिकांना देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ केलेली आहे ही वाढ त्याच्या शहिदीच्या तुलनेत कमीच आहे, तरी छोटासा प्रयत्न शासनाच्या वतीने होत आहे. आपणही ध्वज दिनानिमित्त निधी संकलनाच्या कार्यास हातभार लावू शकता आणि आपल्या देशाच्या देशसेवेसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सैनिकांच्या ऋणात सदैव राहू शकता. या निधीवर कुठलाही कर लावल्या जात नाही. आपल्या जिल्ह्यातील माजी सैनिकांना या निमित्ताने एक वेगळी मानवंदना देऊया.

ज्यांना कुणाला ध्वजनिधी संकलनात योगदान दयायचे असल्यास त्यांनी अलर्लेपीं छे. २०११८३३३०४१, खऋडउ उेवश छे. चअकइ००००५८ या खात्यात सहयोग राशी जमा करावी. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथील जिल्हा सैनिक कल्याण कक्षातील कल्याण संघटक धनराज बावनथडे यांचेशी संपर्क साधून माहिती दयावी.

**– मानसी पाटील**
उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन)तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी

# बाल विवाहाला आळा घालण्यासाठी जिल्ह्यात १०० दिवसाचे अभियान

**गोंदिया :-** बाल विवाह मुक्त भारताचे ध्येय पुर्ण करण्यासाठी सर्व राज्यांना आणि केंद्र शासीत प्रदेशांना १०० दिवसांची मोहिम राबविण्याबाबत केंद्र शासनाच्या सूचना प्राप्त आहेत. त्यानुसार १४ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ पर्यंत या कालावधीत ही मोहिम राबविली जात आहे. सदर कालावधीत शाळा, महाविद्यालय, गावस्तरावर, शहरी भागात वार्डस्तरावर तसेच ज्या-ज्या ठिकाणी लोकांचा समुह असेल तिथे बालविवाह बाबत जागरुकता निर्माण करणे, विविध ठिकाणी चर्चासत्र, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रतिज्ञा घेणे, समारंभ आयोजित करणे, सुचना फलक लावणे, पोस्टर लावणे, जेणेकरुन नागरिकांचा बालविवाहा सारख्या अनिष्ट प्रथेवर लक्ष केंद्रित होईल.

जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्यांच्या आणि जिल्हा बाल संरक्षण समितीतील अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन गोंदिया जिल्हयात विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.



या अभियानातील १०० दिवसाच्या कालावधीत बालविवाह हा प्रामुख्याने विषय घेऊन ग्रामपंचायत स्तरावर आणि वार्डस्तरावर सभा घेण्यात याव्यात. बालविवाह मुक्त गोंदिया जिल्हा निर्माण करण्यासाठी या मोहिमेचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. या मोहिमेमुळे बालविवाह संदर्भात नागरिकांच्या मानसिकतेत बदल होण्याचा विश्वास जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी व्यक्त केला आहे.

बालबिवाह ही अनिष्ट प्रथा असून ती समाजात खोलवर रुजलेली आहे. बालविवाहामुळे बालकांच्या आरोग्यावर व त्यांच्या विकासावर खुप मोठा परिणाम होतो. देशाच्या विकासाकरीता सुदृढ नागरिक तयार करण्यासाठी, त्यांच्या अधिकाराचा उल्लंघन होणार नाही याबाबत जनतेमध्ये बालकांसंबंधित कायदयाची जाणीव असणे आवश्यक आहे. यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्र येऊन या अभियानात सहभागी व्हावे आणि बालविवाहमुक्त गोंदिया जिल्हा निर्माण करण्यासाठी नागरिकांनी आपले योगदान द्यावे तसेच लग्न पत्रिका छपाई करणारे प्रिंटिंग प्रेस चालक, मंडळ डेकोरेशन चालक, फोटोग्राफर, आचारी, मंगल कार्यालय/लॉन, सभागृह व्यवस्थापक, बॅन्ड वादक, कॅटरींग चालक, विविध धर्मातील लावण्यात येणारे श्रध्दास्थाने व इतर सामुहिक विवाह ट्रस्ट यांनी बालविवाह होणार नाही याची खातरजमा करावी. तसेच आपल्या गावात, शेजारी, नातेवाईकात बालविवाह होत असल्यास महिला व बाल विकास विभागाच्या चाईल्ड हेल्प लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्षाशी संपर्क साधावे. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रेश्मा मोरे यांनी केले आहे. बाल विवाह संदर्भात माहिती देणाऱ्यांचे नाव, पत्ता गोपनीय ठेवण्यात येईल.

इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी गोंदिया ही बाल हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जिल्ह्यात काम करीत आहे. २७ नोव्हेंबर रोजी ङ्गबालविवाह मुक्त भारतङ्ग मोहिमेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त इंडियन सोशल वेलफेअर सोसायटीने शाळा, ग्रामीण समुदाय आणि इतर संस्थांमध्ये सदर संस्थेने बालविवाह प्रतिबंध कायद्याच्या तरतुदींबद्दल जनतेला जागरुक केले आणि स्पष्ट केले की, कायद्यानुसार लग्नातील पाहुणे, केटरर्स, तंबू मालक, बँड सदस्य, सजावट करणारे किंवा बालविवाह करणारे पुजारी यांच्यासह कोणत्याही प्रकारे बालविवाहात सहभागी असलेल्या किंवा त्यांना मदत करणाऱ्या कोणालाही या गुन्ह्याला प्रोत्साहन दिल्याबद्दल शिक्षा होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यात कुठेही बालविवाह होणार नाही याची दखल घेण्यात यावी.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ६,९०० प्रकरणांचा निपटारा पक्षकारांनी केले समाधान व्यक्त

**गोंदिया :-** वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले सामोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरीता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई याचे निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.जोशी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एन.के.वाळके यांचे मार्गदर्शनाखाली १३ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिला न्यायालय, गोंदिया येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समित्यामार्फत तालु?का न्यायालयांमध्ये तडजोड पात्र न्यायप्रविष्ठ व पूर्व न्याय प्रतिष्ठ प्रकरणाकरीता तसेच विद्युत व बँका तसेच लोकोपयोगी पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणाकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर लोकन्यायालयाचे उ?द्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी आर.एन.जोशी यांनी लोकअदालतीचे फायदे व महत्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले, तसेच एन.के.वाळके यांनी जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्याचे आवाहन केले.

या लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेल्या न्यायालयात प्रलंबीत प्रकरणांपैकी १,४०० प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली, त्यापासून ६ कोटी ५४ लक्ष ७८ हजार ९३५ रुपयांची वसुली झाली. पुर्वन्यायप्रविष्ठ १४,६६९ प्रकरणांपैकी ५,५०० प्रकरणे निकाली काढण्यात आली, यामध्ये १ कोटी ७९ लक्ष, ६५ हजार ४९१ रूपयांची वसुली झाली. अशाप्रकारे एकुण १९,८९० ठेवलेल्या प्रकरणांपैकी ६,९०० प्रकरणे निकाली काढण्यात आली व त्यापासून ८ कोटी ३४ लक्ष ४४ हजार ४२६ रुपये एवढी वसुली झाली.

त्याचप्रमाणे स्पेशल ड्राईव्ह अंतर्गत जिल्ह्यातील न्यायालयामध्ये एकूण २१५ फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली होती, त्यापैकी २०१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामुळे पक्षकार व इतरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास यामधून सुटका मिळाली. त्यामुळे बऱ्याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले. या लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे महावितरणचे तसेच विद्युत, पाणी, टेलीफोन, बँक रिकव्हरी यांचे पूर्वन्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या पक्षकारांनी तडजोडीप्रमाणे थकबाकीची पूर्ण रक्कम संबंधित विभागाला जमा केली त्याची प्रकरणे कायमची संपवण्यात आली. यामुळे संबंधित विभाग व थकबाकीदारांचा भविष्यातील न्यायालयीन खर्च व मानसिक त्रास वाचला.

महत्वाचे असे की, दोन जोडप्यांनी नव्याने संसार सुरू केला. तसेच अपघात नुकसान भरपाईच्या प्राधिकरणाच्या ३३ प्रलंबित प्रकरणात विमा कंपन्यांनी ३ कोटी २० लक्ष ५९ हजार रुपये नुकसान भरपाई मंजुर केल्याने पिडीतांना त्या रक्कमेचे निवाडे देवून त्यांची प्रकरणे सामंजस्याने तडजोड करून निकाली काढण्यात आली.

# १४२१ मामा तलाव अतिक्रमणाच्या विळख्यात

**नवेगावबांध :-** तलावांचा जिल्हा अशी ओळख गोंदिया जिल्ह्याची आहे. पण हळूहळू ही ओळख धूसर होत चालल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील १४२१ मामा तलाव सध्या अतिक्रमणांच्या विळख्यात सापडले आहे. अतिक्रमणामुळे अनेक तलाव गायब झाल्याचे चित्र आहे. तलावांवरील मोठ्या प्रमाणातील बेकायदेशीर शेती, भराव, गोठे, झोपड्या आणि अन्य बांधकामांमुळे तलावांचा मूळ आकार बदलला असून सिंचन क्षमतेत घट झाली आहे.

पूर्वी सिंचनाची अपुरी साधने असल्याने गावातील मालगुजारांनी गावात तलाव तयार केले होते. त्यामुळे हे तलाव मालगुजारी तलाव म्हणून ओळखले जाऊ लागले. या तलावांची शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीत मोठी मदत होत होती. शिवाय भूजल पातळी कायम ठेवण्यात सुध्दा या तलावांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. गोंदिया जिल्ह्यात १४२१ मामा तलावांची नोंद आहे. मात्र यापैकी

अनेक तलाव आता गायब झाले आहे. काही तलावांवर अतिक्रमण करण्यात आले आहे. अनेक तलावांमध्ये पाण्याचा नैसर्गिक मार्ग अडविला जात असल्याने पिकांना पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे.

किनारी भागात वाढलेल्या अतिक्रमणामुळे पाणथळ जागा नष्ट होत अतिक्रमण आहे. तर जैवविविधतेला ही मोठा धोका निमाण झाला आहे. तलावांचे संरक्षण, पुनर्स्थापना आणि हटवण्यासाठी सर्वांत महत्त्वाचे पाऊल म्हणजे सीमांकन मोजणी करणे. सर्वेक्षण विभाग, जलसंपदा विभाग, महसूल व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त सहकार्यातून झालेली अचूक मो-जणी हीच अतिक्रमण हटवण्याची पहिली आणि आवश्यक अट असल्याचे अधिकारी सांगतात. १४२१ तलावांची मोजणी, नकाशा, तांत्रिक कर्मचारी, प्रवास, तपासणी, अहवाल तयार करणे या सर्व प्रक्रियेसाठी एकूण १० कोटी ४५ लाख रुपयांच्या निधीची गरज असल्याचे जिल्हा परिषदेने शास-नाला कळिवले आहे. परंतु शास-नाने हा निधी उपलब्ध करुन न दिल्याने मामा तलावांच्या मोजणीचे काम रखडले आहे.

# बचत गट भवनाचे जि.प.सदस्य माधुरी रहांगडाले यांच्या हस्ते लोकार्पण



**तिरोडा :-** ग्रामीणसह शहरी भागामध्ये विविध प्रक्रिया पदार्थांची मागणी वाढत आहे, ही बाब लक्षात घेत महिलांनी एकत्र येत बचत गट तयार केला. दरम्यान महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी तालुक्यातील चिखली येथे बचत गट भवान तयार करण्यात आले. दरम्यान पहिले बचत गट भवनाचे लोकार्पण आज १५ डिसेंबर रोजी जिल्हा परिषद सदस्य माधुरी रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पं. स. सदस्य कविता सोनेवाने, सरपंच कैलाश पटले, कपील बावणे, पी. आर. पटले, भुमेश्वर पटले, अनिता आदमने, माया कटरे, कल्पना हरिणखेडे आदी उपस्थित होते.

# संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी कार्यक्रम आज

**गोरेगाव :** संताजी तेली समाज मंडळ गोरेगावच्या वतीने संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी सोहळा उद्या (ता.१७) संताजी परिसर, हनुमान मंदिरजवळ आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाची सुरूवात सकाळी ११ वाजता संत शिरोमणी संताजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलनाने करण्यात येणार आहे.

यानंतर दुपारी १२ ते १.३० वाजता दरम्यान महारॅली, दुप-ारी १.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यत स्व-ागत, हळदी-कुंकू, हभप हुपराम गिऱ्हेपुंजे महाराज यांचे किर्तन व दहीकाला, आरती प्रसाद वितरण व सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यत स्नेहभोजनाने कार्यक्रमाचे सांगता करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येत उपस्थित रहावे, असे आवाहन संताजी तेली समाज मंडळाचे अध्यक्ष रघुपती अगडे, उपाध्यक्ष रामभाऊ अगडे, सचिव पांडूरंग साखरवाडे, अनिलकुमार अगडे, आनंदराव अगडे, छन्नीलाल अगडे, धनलाल पिसे, राजु अगडे, दिगंबर अगडे, विजय अगडे, विष्णुदास साठवणे, यो-गराज हटवार, मुन्नालाल बावणकर, नरेश अगडे, अशोक गिऱ्हेपुंजे व समस्त संताजी तेली समाज मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# इटियाडोह धरणाच्या देखभाल व दुरूस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**अर्जुनी मोरगाव :-** तालुक्यातील गाढवी नदीचे पाणी अडविण्यासाठी व शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी यासाठी सन १९७२ मध्ये इटियाडोह तयार करण्यात आले. या धरणामुळे शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात सिंचनाची सोय झाली. मात्र, कालांतराने या धरणाच्या देखभाल दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी या धरणाचे पाणी झिरपत असल्याने



परिसरातील शेतीचे नुकसान होत आहे. मात्र, याकडे शासन आणि प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे.

सन १९७२ मध्ये इटियाडोह धरण बांधून गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यात, भंडारा जिल्ह्याचा काही भाग व गडचिरोली जिल्ह्याच्या काही भागाला या धरणाच्या मदतीने सिंचन करणे सोयीचे झाले. खरीप व रब्बी हंगामात पूर्णतः या धरणाच्या पाण्यावर धान पिकाचे उत्प-ादन घेत आहे. त्यावेळी शेतीला सिंचनाची सोय नसल्याने हा धरण शेतकऱ्यांसाठी वरदान ठरला. सततच्या ओलितामुळे जमिनीचा पोत खराब होतो की काय अशी अवस्था निर्माण झाली आहे.

पावसात दरवर्षी धरणामध्ये मुबलक पाणीसाठा होतो. त्यामुळे दरवर्षी शेकडो एकर जमिनीला सिंचन होते. खरीप हंगामात हवे असल्यास शेतकऱ्यांना धरणाचे पाणी दिले जाते.

डिसेंबर महिन्यात सुरू होण-ारा रब्बी हंगामात धरणाचे पाणी सोडल्या जात असल्याने गेल्या अनेक वर्षापासून शेतीमध्ये धान पिकाचे उत्पादन घेतल्या जाते. गेल्या आठ दहा वर्षांपासून सतत रब्बी हंगामात धान पिकाचे उत्पादन घेतले जात आहे.

### ५० वर्षांपासून देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष

५० वर्षापेक्षा अधिकचा काळ लोटूनही पाटबंधारे विभागाने कालव्यांची दुरुस्ती केली नाही. सन १९७२ पासून संपूर्ण धरणावर लघु पाटबंधारे विभागाचे कर्मचारी काम पाहत होते. मात्र २००५-०६ पासून इटियाडोह लाभ क्षेत्रात पाणी वापर सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. आजपर्यंत ना शासनाने ना पाणी वापर सोसायटीने कालव्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले नाही. परिणामी कालव्यांची पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी कालव्यातील पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. धरणाचे पाणी सतत वाहत राहत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांची शेतजमीन खराब होत आहे

# गोठणगावात राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया

**गोंदिया:-** कुटुंब नियोजन कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तसेच या कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग अधिक प्रयत्नशील व बळकट करण्यासाठी जिल्ह्यात यावर्षी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आला.पंधरवडानिमित्त ३ डिसेंबर रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील अतिदुर्गम व जंगलव्याप्त पीएचसी गोठणगाव येथे कुटुंब कल्याण नसबंदी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ११ नसबंदी शस्त्रक्रिया यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. देवेंद्र घरतकर यांनी दिली आहे. सफल शस्त्रक्रिया



सर्जन स्वतः डॉ. देवेंद्र घरतकर यांनी केल्या. समुदाय आरोग्य अधिकारी गौरव टेंभेकर यांनी सहाय्यकाची भूमिका निभावली. पीएचसी गोठ्णगाव कार्यक्षेत्रातील एकूण ११ नसबंदी शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्या. त्यात ४ पुरुष व ७महिलांनी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केल्यात.

मोहिमेदरम्यान जिल्ह्यात पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करून लोकांना मोफत सेवा देण्यात येत असून, व्यापक प्रसिद्धी व्हावी, जेणेकरून पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेची गुणवत्ता पूर्ण व खात्रीशीर सेवा लाभार्थ्यांना सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. पुरुष नसबंदी पंधरवडा साजरा केल्याने पुरुष शस्त्रक्रियेबाबत समाजात जनजागृती होऊन पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेचे प्रमाण वाढविण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी म्हटले आहे.यशस्वीतेसाठी लोकांना प्रवृत्त करण्यास आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांनी महत्वाची भूमिका बजावली.

शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी होण्यासाठी आरोग्य सहायिका लक्ष्मी मुनेश्वर, आरोग्य सहाय्यक संतोष पारधी व किशोर कुर्वे, आरोग्य सेविका अर्चना मेंढे, कोमल पडोळे, प्रमिला रॉय, निराशा शहारे, कोडाप, विजू साखरे, यमुना मानापुरे, नहामुर्ते, फार्मासिस्ट मुकूल बडावाईक,प्रयोगशाळा तंत्रज्ञ नेहा कापर स्टाफ ब्रदर चिरायू वावरे, आरोग्य सेव अमोल मालेकर, सय्यद, परि बंडू उके व कुमुद शहारे या आरोग्य सेवा दिली.

# महिला अत्याचाराविरोधात पी.डी.रहांगडाले विद्यालयात मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रम

**गोरेगाव:-** महिला व बालविकास विभागातर्फे सखी अभियानांतर्गत महिला अत्याचार रोखण्यासाठी मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन येथील पी.डी.रहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आले होत. या कार्यक्रमात महिलांवरील कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ, मानसिक व शारीरिक अत्याचार याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

मार्गदर्शकांनी महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती दिली. महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, १८१ महिला हेल्पलाईन, पोलीस मदत, तसेच समुपदेशन व संरक्षण सेवा याबाबत वर्ग ९ते१२ च्या विद्यार्थिनींना रवी अंबुले तालुका संरक्षण अधिकारी,माधुरीताई बिसेन समुपदेशक वन स्टाप सेंटर महिला व बालकल्याण विकास गोंदिया,ए.डी.बिसेन सहाय्यक संरक्षण अधिकारी यांनी मार्गदर्शन




केले. या कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य सी.डी.मोरघडे, पर्यवेक्षक ए.एच.कटरे, सी.आर.बिसेन, डी.एम.राठोड, ए.जे.सोरले, जे.वाय.बिसेन, के.आय.कटरे उपस्थित होते. प्राचार्य यांनी मार्गदर्शन करतानी विद्यार्थिनींना अत्याचार सहन न करता योग्य वेळी तक्रार करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात विद्यार्थिनींना सुरक्षिततेसाठी आत्मविश्वास, स्वसंरक्षण, आणि समाजातील सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. उपस्थित विद्यार्थिनींनी प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग घेतला.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढून महिला अत्याचाराविरोधात जागरूकता निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे संचालन सी.आर.बिसेन यांनी तर आभार डी.एम.राठोड यांनी मानले.

**को.वि.उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, तिरोडा यांचे कार्यालय**

क्र./म.सहा./जन्म/मृत्यू/कावि-१०९५/२०२५ दिनांक-१२/१२/२०२५

## जाहिरनामा

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,**श्री.अतुल अर्जुन पंधरे रा.परसाडीटोला ता.गोरेगाव जि.गोंदिया** यांनी आपल्या नामे **अतूल अर्जुन पंधरे यांचा जन्म दिनांक ३०/१२/२०००** रोजी **रा.परसाडीटोला ता.गोरेगांव जि.गोंदिया** येथे झालेला असून त्यांची जन्माची नोंद **ग्राम पंचायत, तिल्ली/मोह ता.गोरेगांव** जि.गोंदिया येथे उपलब्ध नाही. त्यामुळे शासकीय व निमशासकीय कामाकरिता त्यांच्या जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांच्या **जन्म दिनांक ३०/१२/२००० ची ग्राम पंचायत, तिल्ली/मोह ता.गोरेगाव** जि.गोंदिया येथील रेकार्डवर घेण्याचा आदेश मिळण्याबाबत जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

**पूजा गायकवाड**
**उपविभागीय अधिकारी,तिरोडा**

**को.वि.उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, तिरोडा यांचे कार्यालय**

क्र./म.सहा./जन्म/मृत्यू/कावि-११०३/२०२५ दिनांक-१२/१२/२०२५

## जाहिरनामा

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,**श्री.राहूल बारीकराम पंधरे रा.परसाडीटोला ता.गोरेगांव, जि.गोंदिया** यांनी आपल्या नामे **श्री.राहूल बारीकराम पंधरे यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९९८** रोजी **रा.परसाडीटोला ता.गोरेगांव जि.गोंदिया** येथे झालेला असून त्यांची जन्माची नोंद **ग्राम पंचायत, तिल्ली/मोह ता.गोरेगांव** जि.गोंदिया येथे उपलब्ध नाही. त्यामुळे शासकीय व निमशासकीय कामाकरिता त्यांच्या जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांचे **जन्म दिनांक ०५/०३/१९९८ ची ग्राम पंचायत, तिल्ली/मोह ता.गोरेगाव** जि.गोंदिया येथील रेकार्डवर घेण्याचा आदेश मिळण्याबाबत जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

**पूजा गायकवाड**
**उपविभागीय अधिकारी,तिरोडा**

**को.वि.उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, तिरोडा यांचे कार्यालय**

क्र./म.सहा./जन्म/मृत्यू/कावि-१०९९/२०२५ दिनांक-१२/१२/२०२५

## जाहिरनामा

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,**श्रीमती जैवंता हनोहर पंधरे रा.चिरचाळी, ता.सडक/अर्जुनी, जि.गोंदिया** यांनी आपल्या नामे **कु.रूखमा हरिचंद उईके यांचा जन्म दिनांक १८/०५/१९७५ रोजी रा.परसाडीटोला ता.गोरेगांव जि.गोंदिया** येथे झालेला असून त्यांची जन्माची नोंद **ग्राम पंचायत, तिल्ली/मोह ता.गोरेगांव** जि.गोंदिया येथे उपलब्ध नाही. त्यामुळे शासकीय व निमशासकीय कामाकरिता त्यांच्या जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांच्या **जन्म दिनांक १८/०५/१९७५** ची **ग्राम पंचायत, तिल्ली/मोह ता.गोरेगाव** जि.गोंदिया येथील रेकार्डवर घेण्याचा आदेश मिळण्याबाबत जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

**पूजा गायकवाड**
**उपविभागीय अधिकारी,तिरोडा**

# भटक्या कुत्र्यांचा वाढला वावर, निवारागृह नसल्याने आता कोठे ठेवणार?

**गोंदिया :-** भटक्या कुत्र्यांना मोकळ्या जागेत खायला देणाऱ्या व्यक्तींवर आता दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तसेच पकडलेल्या कुत्र्यांना निवारागृहात ठेवले जाईल. सुप्रीम कोर्टाच्या आदेशावरून नगरविकास विभागाने सर्व महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना निर्देश दिले आहेत. मात्र, जिल्ह्यात श्वानांसाठी निवारागृह नाहीत. त्यामुळे त्यांना कोठे ठेवणार, असा प्रश्न आहे.

शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या हजारच्या आसपास आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण होत असून, काही प्रकरणांमध्ये कुत्र्यांच्या चाव्यामुळे शारीरिक इजादेखील झाली आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार नगरविकास विभागाने शहरातील भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनासाठी पावले उचलण्याचे निर्देश नगरपालिकांना दिले आहेत. भटक्या कुत्र्यांना पकडून निवारागृहात ठेवणे, निर्बीजीकरण करणे आणि अँटिरेबीज लसीकरण करणे अनिवार्य आहे. याशिवाय मोकळ्या जागेत कुत्र्यांना खायला देणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होणार आहे.



### निवारागृहात ठेवण्याचे न्यायालयाचे आदेश

**पकडलेल्या भटक्या कुत्र्यांना निवारागृहात ठेवण्याचे स्पष्ट आदेश आ-हेत. मात्र, शहरात निवारागृह नाही. त्यामुळे स्थानिक प्रशासनासमोर आव्हान निर्माण झाले आहे.**

### गोंदियात निर्बीजीकरण झालेच नाहीच

**गोंदियात सुमारे सात-आठ वर्षांपूर्वी कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले होते. त्यानंतर कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले नाही. परिणामी संख्या झपाट्याने वाढत आहे.**

### कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण अनिवार्य

**पकडलेल्या सर्व कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि अँटिरेबीज लसीकरण करणे अनिवार्य आहे. हे उपाय कुत्र्यांमध्ये अतिवाढ रोखण्यासाठी तसेच रेबीजसारख्या रोगांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक आहे.**

### मोकळ्या जागेत खाद्य दिल्यास दंडात्मक कारवाई

**भटक्या कुत्र्यांना मोकळ्या जागेत खायला देणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल. नागरिकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, असे नगरविकास विभागाने स्पष्ट केले आहे. शहरात अनेक भटकी कुत्री फिरत आहेत. अनेक नागरिक मोकळ्या जागेत कुत्र्यांसाठी खाद्य पदार्थ टाकतात, त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला गेला नसल्याने अडचणी वाढत आहेत.**

### शहरात कुत्र्यांनी घेतला अनेक नागरिकांना चावा

**शहरात कुत्र्यांनी आत्तापर्यंत अनेकांना चावा घेतला आहे. त्यामुळे नागरिकांना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घ्यावा लागला. आ-ताही शहरात कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे शहरात फिरताना नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

### उपाययोजना न केल्यास अधिकारी जबाबदार

**सर्व उपाययोजना वेळेत आणि योग्य पद्धतीने राबविण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांना जबाबदार ठरवले जाणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनी योग्य कर्तव्य पार पाडणे आता आवश्यक झाले आहे, अन्यथा कारवाई होईल, असे असतानाही कामात कुचराई करणाऱ्यांची काही कमी असल्याचे येथील स्थिती बघता दिसत नाही.**

**जाहिरात व बातम्याकरीता बेरार टाईम्स कार्यालयाशी संपर्क करावे.८०८०८१५३२९**

**ग्रामपंचायत कार्यालय वडेगाव/बंध्या,**
**पंचायत समिती अर्जुनी/मोर.,जिल्हा परिषद गोंदिया**

## निविदा सुचना

जा.क्र.३६/२०२५ दिनांकः-१७/१२/२०२५

ग्रामपंचायत कार्यालय वडेगाव/बंध्या, पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालील विवरण पत्रामधील पूर्ण बांधकामाची निविदा महाराष्ट्र शासन तरतुदीच्या अधीन राहून यथायोग्य नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नाव | नियोजन वर्ष | सांकेतांक क्रमांक | अंदाजपत्रक किमंत | निविदा फार्म किमंत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | २०२४-२५ | ९६३७५३९० | २०००००/- | ५००/- | २०००/- |
| २ | जि.प.शाळा वडेगाव/बं.,वारव्ही, अंभोरा व चिचटोला इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | २०२४-२५ | ९६३७०८१९ | ३०००००/- | ५००/- | ३०००/- |

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | दि.१७/१२/२०२५ |
| २ | निविदा विक्री व स्वीकृती अंतिम दिनांक | १७/१२/२०२५ स.१०.३० ते २४/१२/२०२५ च्या सायं.०५.०० पर्यंत |
| ३ | निविदा उघडण्याचा दिनांक | मोहोरबंद निविदा शक्य झाल्यास माहे.डिसेंबर २०२५च्या मासिक सभेत उघडण्यात येईल याची विशेष नोंद घ्यावी. |

**टीप:-**सदर निविदेची विस्तृत माहिती व अटी शर्ती ग्रामपंचय वडेगाव/बंध्याच्या नोटीस बोर्डवर बघायला मिळेल.सार्वजनिक व शासकिय सुट्टीच्या दिवस वगळून निविदा फार्म विक्री व अनामत रक्कम भरुन जमा करता येईल.


**सरपंच**
**ग्रामपंचायत वडेगाव/बंध्या**

**ग्राम पंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत वडेगाव/बंध्या**

# जिल्ह्यात जलजीवन मिशनचा पूर्णपणे झाला बट्ट्याबोळ

## विधानसभेत आमदार बडोले यांनी वेधले लक्ष

**गोंदिया :–** राज्यात ५१,५६० जलजीवन मिशन योजना मंजूर झाल्या होत्या. २०२५ अखेरपर्यंत फक्त २५,५५० योजना पूर्ण झाल्या आहेत. जवळपास २६ हजार योजना रखडलेल्या आ–हेत. ३१ हजार कोटी रुपये खर्च झाले असले तरी ९० टक्के योजना पूर्ण झाल्या, असा दावा फक्त कागदावर आहे. तर गोंदिया जिल्ह्यात या योजनेचा पूर्णपणे बट्ट्याबोळ झाला असून, ८० टक्के गावांमध्ये नळाला अद्यापही पाणी आलेले नाही. त्यामुळे या योजना पूर्ण होणार केव्हा आणि नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी केव्हा मिळेल? असा सवाल आ. राजकुमार बडोले यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या



हिवाळी अधिवेशनात गुरुवारी (दि. १०) उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले.

केंद्र पुरस्कृत मजलजीवन मिशनफ योजनेच्या अंमलबजावणीवर ताशेरे ओढले. प्रत्यक्षात गावोगावी लोक विच–ारतात नळाला पाणी केव्हा येईल? खोद–लेले रस्ते केव्हा होतील?

### वनहक्क पट्टे रखडल्याने घरकुल योजनाही ठप्प

**गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या वनप्रधान जिल्ह्यांमध्ये नगरपालिका–नगरपंचायतींतर्गत हजारो घरकुले मंजूर असू–नही वनहक्क पट्टे वाटप न झाल्याने बांधकाम सुरू होऊ शकत नाही. वारंवार प्रस्ताव पाठवूनही कार्यवाही होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.**

चोरीला गेलेल्या नळाच्या तोट्या कधी मिळतील? यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप असल्याचे आ. राजकुमार बडोले यांनी सभागृहात सांगत या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधले. गोंदिया

### अर्जुनी मोरगाव मतदारसंघात फक्त २५ योजना पूर्ण

**अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात १५० योजना मंजूर असून, त्यापैकी फक्त २५ योजना पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित योजना कधी पूर्ण होतील, याचे उत्तर प्रशासनाकडेही नाही. जलस्वराज्य योजनेप्रमाणे जलजीवन मिशनचा बट्ट्याबोळ होऊ नये, अशी विनंती बडोले यांनी विधानसभेत केली.**

जिल्ह्यातील ८६७ गावांपैकी केवळ २५ गावांमध्ये योजना पूर्ण झाल्या. उर्वरित ७३८ गावांमध्ये योजना अर्धवट किंवा प्रलंबित आहे. १,०४७ पैकी फक्त ४४५ योजना पूर्ण, त्यातल्या त्यात केवळ ९० योजना कार्यान्वित, ६०२ योजना अपूर्ण अवस्थेत आहेत. तर ८० टक्के गावांना अजूनही नळजोडणीचे पाणी मिळाले नसल्याची बाबही सभागृहाच्या लक्षात आणून दिली.

कंत्राटदारांचा आर–ोप आहे.आम्हाला पैसे मिळाले नाहीत. संपूर्ण जिल्ह्यात फक्त ३–४ एजन्सींना विद्युत जोडणीचे कंत्राट देण्यात आले असून, त्यांनी अवघे १० टक्के काम केले आहे. उर्वरित सर्व योजना प्रलंबित आहेत. उर्वरित निधी तत्काळ द्या आणि योजना लवकरात लवकर पूर्ण करा, अशी मागणी त्यांनी केली.

# अर्जुनी मोरगावात अवैध रेती उत्खनन

**अर्जुनी मोरगाव:–** गोंदिया जिल्हाना शेवटच्या टोकावर आदिवासी दुर्गम तालुका म्हणून तालुक्याची शासन दरबारी नोंद आहे. अर्जुनी मोर तालुक्यात रेती घाट तसे नावापुरतेच. उत्कृष्ट रेती तर मुळात नाहीच, मात्र बोरी गावातील रेती घाटातून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उत्खनन सुरू असून हे सर्व उत्खनन महसूल विभागाच्या देखरेखीखाली सुरू असल्याचे तालुक्यात चर्चा सुरू आहे.

रेती घाटातून दररोज शेकडो ट्रॅक्टर रेती बेकायदेशीरपणे रेतीमाफियांकडून काढून विक्री केली जात आहे. राजरोसपणे दिवसा ढवळ्या रेती भरलेले ट्रॅक्टर रस्त्यांनी चालत असून तालुक्याचे तहसीलदार महसूल अधिकारी मूग घेऊन बसलेले दिसत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. स्थानिक प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचा रेतीमाफियांना पूर्ण सहकार्य असल्याचे बोलले जात आहे. प्रशासनातील अधिकारी या रेतीमापियांकडून लाखो रुपयांची वसुली करत असल्याचे दिसून येत आहे. या

अवैध रेती उत्खननामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून नदीकाठाची धूप होत आहे. परिणामी, जमिनीतील भूजल स्तर दिवसेंदिवस घटत आहे. वन्यजीवांच्या अधिवासावर गंभीर परिणाम होत आहे.




### कोणताही अधिकारी मुख्यालयी नाही

**महसूल अधिकारी मुख्यालय राहत नसल्याने तसेच त्यांचे खिसे गरम होत असल्याने या अवैध रेती वाहतुकीवर कोणाचे निबंध नसल्याने हे अवैध रेती वाहतूक खुलेआम सुरू आहे. संबंधितांवर कारवाईची मागणी जनतेकडून होत आहे. अर्जुनी मोरगावचे तहसीलदार अनिरुद्ध अवैध उत्खननाविषयी प्रस्तूत प्रतिनिधीने कांबळे यांना विचारणा केली असता दोषीवर कारवाई करू, असे सांगितले**

या अवैध रेती उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत आहे तर अधिकारी कर्मचाऱ्यांचे खिशे गरम होत आहेत. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविला जात आहे. या अवैध रेतीमाफियांना पाठीशी घालणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी जनतेकडून होत आहे. गत अनेक वर्षांपासून हे रेती उत्खनन अवैधपणे सुरू असून या धंद्यात गुंतलेले माफिया मसर चढकर बोलेफ तोऱ्यात वावरत आहेत. आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांना या कामात, पैसे देतो आमचे कोणीही वाकडे करू शकत नाही, या तोऱ्यात वावरून सर्वसामान्य जनतेला धमकावत सुद्धा आहेत. मचोर तो चोर वरून शिरजोरफ अशी भूमिका रेतीमाफिया वर्ग घेत आहे. या माफियांवर कोणाचेही वर्चस्व नसल्याने तसेच महसूल विभागाची मेहरबानी यांच्यावर असल्याने अर्जुनी मोर तालुक्यात खुलेआम अवैध रेती वाहतूक सुरू आहे.

# २१ जणांचा वन्यप्राण्यांनी घेतला जीव



### जखमींना दिले तीन कोटी

**जिल्ह्यात मागील पाच वर्षात श्वापदांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या २९५ लोकांना सानुग्रह मदत म्हणून तीन कोटी १८ लाख ४६ हजार रुपये वनविभागाकडून देण्यात आले. २०२०–२१ मध्ये २९ लाख ६५ हजार, २०२१–२२ मध्ये ४१ लाख ४४ हजार, २०२२–२३ मध्ये ६२ लाख एक हजार, २०२३–२४ मध्ये ८३ लाख दोन हजार, २०२४–२५ मध्ये २० लाख एक हजार रुपयाची मदत देण्यात आली.**

| सन | मृत |
|---|---|
| २०२०– | २१=०४, |
| २०२१– | २२=०३, |
| २०२२– | २३=५, |
| २०२३– | २४=०४, |
| २०२४– | २५=०१, |
| २०२५– | २६=०४ |

**गोंदिया :–** जिल्ह्यात वनालगत राहणारे लोक नेहमी वन्यप्राण्यांच्या संपर्कात येतात. हा संपर्क वन्यप्राण्यांना आवडत नसल्यामुळे मागील पाच वर्षात जिल्ह्यातील २१ जणांना वन्यप्राण्यांनी ठार केले तर २९५ लोकांना गंभीर जखमी केले आहे.

जिल्हा गोंदिया वनाच्छादित असल्याने वन्यप्राण्यांची संख्या बऱ्यापैकी आहे. मात्र दिवसेंदिवस वनांची संख्या कमी होत असून वन्यप्राणी स्वतःला असुरक्षित समजून जंगलात हस्त–क्षेप करणाऱ्यांवर हल्ला करीत आहेत. मागील पाच वर्षाची परिस्थिती पाहता जिल्ह्यात वन्यप्राण्यांनी हल्ला करून २१ लोकांचा जीव घेतला असून २९५ लोकांना गंभीर जखमी केले आहे.जंगलालगत असलेल्या गावांत वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या पोटापाण्याची अर्धी समस्या जंगलातून मिटत असल्यामुळे वन्यप्राणी व माणूस यांच्यात अनेकदा चकमक होते. परिणामी श्वापदांच्या हल्ल्यात लोकांना प्राणास मुकावे लागते.

### मृताच्या कुटुंबीयांना तीन कोटींची मदत

मागील पाच वर्षात मरण पावलेल्या २१ पैकी १७ लोकांना तीन कोटी रुपयांची मदत करण्यात आली. परंतु यंदा मृत्यू झालेल्या चौघांच्या प्रस्ता–वावर विचार झाला नसल्याने त्यांना मदत मिळाली नाही. सन २०२०–२१ मध्ये ६० लाख, २०२१–२२ मध्ये ४५ लाख, २०२२–२३ मध्ये २० लाख, २०२३–२४ मध्ये ८० लाख, २०२४–२५ मध्ये २५ लाखांची मदत देण्यात आली.

# गडचिरोलीला स्टील सिटी बनविण्याचे ध्येय

**गडचिरोली:–** दे–शाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री दोघेही गडचिरोलीच्या विकासाबाबत अत्यंत सकारात्मक व उत्सुक आहेत. लॉय कंपनी या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे.गडचिरोलीला जमशेदपूरपेक्षाही मोठे स्टील सिटी म्हणून विकसित करण्याचे ध्येय असल्याचे प्रतिपादन लॉय मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरण यांनी केले.गडचिरोलीला राष्ट्रीय आणि जागतिक कौशल्य विकास केंद्रामध्ये रूपांतरित करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत, लॉय मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडने गुरुवारी (दि. ११) लॉय मिशन फॉर ग्लोबल स्किल्स अँड एंटरप्रेन्योरशिप या उपक्रमाची सुरुवात केली. पहिल्या टप्प्यात ३०० बेरोजगारांना मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. टप्प्याटप्याने १० हजार तरुणांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट आहे. शहरालगतच्या बोदली येथे लॉय मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी.प्रभाकरण यांच्या हस्ते तसेच अल्का मिश्रा, एलआयसीएलचे व्यवस्थापकीय संचालक व्यंकटेश संधील व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी प्रभाकरण बोलत होते. मुख्यमंत्री व पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात सुरु झालेला हा उपक्रम गडचिरोलीतील तरुणांसाठी अभूतपूर्व संधी निर्माण करणारा आहे. या माध्यमातून गरजू व होतकुरु बेरोजगारांना रोजगाची संधी मिळेल. यावेळी अनेक अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

९० दिवसाच्या या प्रशिक्षणात ४५ दिवस क्लासरुम ट्रेनिंग आणि ४५ दिवस ऑन–जॉब ट्रेनिंगचा समावेश आहे. याशिवाय महिलांसाठी खास श्री–व्हीलर ड्रायव्हिंग कोर्सेसद्वारे प्रशिक्षणाची संधी दिली जाणार आहे. एकूण ४ हजार पेक्षा अधिक प्रशिक्षित व्यावसायिक ड्रायव्हर्स तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

### अॅट्रॉसिटी अॅक्टमध्ये मृत व्यक्तीच्या वारसास मिळणार सरकारी नोकरी

**भंडारा:** जिल्ह्यात अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत दाखल खून प्रकरणांमध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक व सामाजिक आधार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

अशा प्रकरणांमध्ये दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील एका पात्रब वारसास गट–क किंवा गट–ड संवर्गातील शासकीय अथवा निमशासकीय नोकरी देण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी बोनस जाहीर करा



**गोंदियाः–** अवकाळी पावसाने हादरलेल्या धान उत्प–ादक शेतकऱ्यांना चालू हंगामात तात्काळ आर्थिक बिलासा मिळावा यासाठी प्रतिहेक्टरी बोनस जाहीर करावा, अशी आग्रही मागणी आमदार विनोद अग्रवाल, आ. विजय रहांगडाले यांनी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. ऑक्टोबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात झा–लेले पीकनुकसान आणि त्यातून शेतकऱ्यांवर आलेले आर्थिक संकट लक्षात घेऊन ही मागणीचे अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहत असल्याने शेतकरी बांधव आपल्या सरकारकडून आशावादी आहे. मागील वर्षी नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी बोनस देण्यात आले. त्याअनुषंगाने यंदाही धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी तात्काळ बोनस जाहीर करूनत्यांच्या आर्थिक संकटातून मोठी मुक्तता करावी, अशी मागणी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशन दरम्यान आ. विनोद अग्रवाल, आ. रहांगडाले यांनी यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेवून निवेदन सादर केले.

**अडचणींवर मात करून शेतकऱ्यांनी उत्पादन घेतले**

जिल्ह्यात ९० हेक्टर शेतकरी धान शेतीवर अवलंबून आहेत. अनियमित अनियमित पाऊस, वाढता उत्पादन खर्च, खत–बियाण्यांचे वाढलेले दर आणि मजुरीचे दर, या सगळ्या अडचणींवर मात करून आपल्या शेतकऱ्यांनी धानाचे उत्पादन कष्टाने उभे केले आहे. यातील बहुतेक शेतकरी आपले धान किमान आधारभूत किंमतीवर शासन खरेदी केंद्रावर विक्री करतात. अशा परिस्थितीत धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल बोनस मिळणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा ङ्खखरीप हंगाम २०२५ साठी धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल बोनस जाहीर करावाफ ज्यामुळे शेतकऱ्यांच्या अर्थकारणाला स्थिरता मिळेल, आगामी हंगामाचे नियोजन सुभल होईल, हे विशेष.

# आंबेनाला प्रकल्पाच्या कामाला गती द्या

**गोंदिया :–**तिरोडा तालुक्यातील महत्व–पूर्ण असलेल्या आंबेनाला सिंचन प्रकल्पाचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करून शेतकऱ्यांसाठी सिंचनाचा मार्ग मोकळा करावा. तसेच तिरोडा–गोरेगाव विधानसभा क्षेत्रालगत असलेल्या नवीन नागझिरा व्याघ्र प्रकल्पामुळे वाघ, बिबट लोकवस्तीकडे येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर उपाययोजना करण्यात याव्या यासाठी आ. विजय रहांगडाले यांनी गुरुवारी (दि.११) नागपूर वन भवन येथे मुख्य वनसंरक्षक श्रीलक्ष्मी अन्नाबथुल्ला यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.



यावेळी आ. विजय रहांगडाले यांनी मुख्य वनसंरक्षक श्रीलक्ष्मी अन्नाबथुल्ला यांना तिरोडा विधानसभा क्षेत्रातील वन्यजीवांसंदर्भातील ज्वलंत मुद्दे निदर्शनास आणून दिले. वाघांच्या हालचालीवर नियंत्रण व निरीक्षणासाठी पथकांची वाढ करण्यात यावी, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पातंर्गत येणाऱ्या संवेदनशील गावांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. वन्यप्राणी गावाच्या दिशेने धाव घेत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तर वन्यप्राण्यांकडून शेतपिकांचे नुकसान केले जात असल्याने शेतकऱ्यांना त्याचा आर्थिक फटका बसत आहे. यावर उपाययोजना करण्यात यावी. नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजना करण्यात यावी. निमगाव आंबेनाला या सिंचन प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय समन्वय, त्यातील वनविभागाशी निगडित अडचणी दूर करून शेतकऱ्यांना सिंचनाचा मार्ग मोकळा द्यावा करावा अशी मागणी केली. या सर्व मागण्या प्राधान्याने मार्गी लावण्याची ग्वाही मुख्य वनसंरक्षक श्रीलक्ष्मी अन्नाबथुल्ला यांनी आ. रहांगडाले यांना दिली.

# बेवारटोला धरणाच्या कालव्याची कामे केव्हा पूर्ण होणार?-आमदार डॉ. परिणय फुके

**नागपूर :–** गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील बेवारटोला धरणाचा कालवा हा परिसरातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असतानाही त्याची कामे अद्याप अपूर्ण असल्याकडे आमदार डॉ. परिणय फुके यांनी आज विधान परिषदेच्या प्रश्नोत्तर तासात लक्ष वेधले.

बेवारटोला धरणाचे काम सन २००२ मध्ये सुरू झाले. मात्र सन २०२५ उजाडले तरीही या प्रकल्पातून अद्याप प्रत्यक्ष सिंचनाची कोणतीही सुविधा उपलब्ध झालेली नाही, ही गंभीर बाब त्यांनी सभागृहासमोर मांडली. या प्रकल्पामुळे सालेकसा, साकोली, अर्जुनी मोरगाव, गोंदिया व लांजी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळणे अपेक्षित होते. मात्र कालव्याची कामे अपूर्ण राहिल्याने शेतकऱ्यांना आजही पाण्याअभावी मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकल्पावर आतापर्यंत सुमारे ९० कोटी रुपयांचा खर्च झालेला असून कालव्याचे काम अपूर्ण असल्यामुळे हा




खर्च व्यर्थ गेल्याचा आरोप आमदार डॉ. फुके यांनी केला. भंडारा–गोंदिया जिल्ह्या–तील सिंचनाला या धरणाचा कोणताही प्रत्यक्ष लाभ झालेला नाही, असे नमूद करत उर्वरित कालवा कामे नेमकी कधी पूर्ण होणार आणि त्यासाठी आवश्यक निधी केव्हा उपलब्ध करून दिला जाणार, असा थेट सवाल त्यांनी शासनाला केला.

यावर उत्तर देताना जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, बेवारटोला प्रकल्पाला सन १९९३ मध्ये मान्यता देण्यात आली होती. सन २०१८ मध्ये या प्रकल्पासाठी ९० कोटी रुपयांची सुप्रमा मंजूर करण्यात आली आहे. या प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता १,३९० हेक्टर इतकी असून त्यापैकी ९९५ हेक्टर क्षेत्रासाठीची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कालव्याची कामे पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

मात्र प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीत मोठी तफावत असल्याकडे आमदार डॉ. परिणय फुके यांनी लक्ष वेधले. निधीची तातडीने उपलब्धता करून कामांना गती देण्याची मागणी करत त्यांनी हा प्रकल्प ठरावीक कालमर्यादेत पूर्ण करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. यावर मंत्री महाजन यांनी निधी उपलब्ध करून देऊन सहा महिन्यांत प्रकल्प पूर्ण करण्याचा पुनरुच्चार सभागृहात केला.

# दर्रेकसा दलमच्या तीन माओवाद्यांचे आत्मसमर्पण



**गोंदियाः–** जिल्ह्यातून माओवाद चळवळ अखेरच्या वाटेवर असून (दि.१३)शनिवारला दर्रेकसा दलमच्या ३ माओवाद्यांनी गोंदिया पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे.यामध्ये रोशन ऊर्फ मारा इरिया वेडजा कमांडर दर्रेकसा एरिया कमेटी, सुभाष एसीएम, रतन एसीएम असे ०३ माओवाद्यांनी अग्निशस्त्रांसह माओवादी गणवेशात गोंदिया पोलीस अधिक्षक गोरख भामरे यांच्या समक्ष आत्मसमर्पण केले.यांच्यावर महाराष्ट्र शासनाने एकत्रितपणे २० लक्ष रुपयांचे बक्षिस जाहिर केले होते.

महाराष्ट्र सरकारच्या आत्मसर्मण योजनेमुळे तसेच हिंसाचाराच्या जिवनाला कंटाळून वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवादयांनी आधीच पोलीसांसमोर आत्मसमर्पण केलेले आहे.२८ नोव्हेंबर रोजी एम.एम.सी. झोन मधील स्पेशल झोनल कमेटी मेंबर विकास उर्फ अनिल उर्फ नवज्योत नागपूरे, ऊर्फ रमेश सायन्ना भाष्कर लिंगव्या रामास्वामी याचेसह एकुण ११ जहाल माओवाद्यांनी गोंदिया पोलीस समक्ष आत्मसमर्पण केले होते.त्यापैकी दर्रेकसा एरिया कमेटीचे उर्वरीत काही माओवादी सदस्यांना आत्मसमर्पण करण्यासाठी गोंदिया पोलिसांच्यावतीने प्रयत्न सुरु होते.अखेर १३ डिसेंबरला एम.एम.सी. झोन मधील दरेकसा एरिया कमेटी कमांडर रोशन याचेसह ०३ जहाल माओवाद्यांनी गोंदिया पोलीस दलासमक्ष आत्मसमर्पण केले.

आत्मसमर्पित माओवादी कमांडर दर्रेकसा एरिया कमेटी रोशन ऊर्फ मारा इरिया वेडजा,(वय ३५,रा.मेंढरी, ता.जि. बिजापुर,छ.ग) याने डब्ठ, मॅग्झीन–०२,राऊंड– २५ सह आत्मसमर्पण केले.याच्यावर ८ लाखाचे बक्षिस होते.एसीएम सदस्य सुभाष ऊर्फ पोज्जा बंडु रव्वा,(वय २६,रा.येरापल्ली,पो.पामेड,ता.उसुर,जि. बिजापुर, छ.ग.)डब्ठ,मॅग्झीन– ०२,२३ राऊंड सह आत्मसमर्पण केले असून ६ लाखाचे बक्षिस होते.तिसरा माओवादी रतन ऊर्फ मनकु ओमा पोयम पोयाम)वय २५,रा. रेखापाल,पोस्ट ओरचा, ता.जि.नारायणपुर,छ.ग)याने ८ ाा बंदुक,मॅग्झीन– ०१ व राऊंड १५ सह आत्मसमर्पण केले असून याच्यावर ६ लाखाचे बक्षिस होते.

# आमगाव नगर परिषद निर्मितीला मुहूर्त कधीपर्यंत मिळणार?




**आमगाव :–** आमगाव–देवरी विधानसभा मतदारसंघाची विकासयात्रा मागील काही वर्षांपासून मोठ्या अडथळ्यांखाली अडकलेली आहे. प्रशासकीय दिरंगाई, अपुरा निधी, तर कधी मंजुरीनंतरही न सुरू झालेली कामे या सगळ्यांचा थेट फटका नागरिकांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर हिवाळी अधिवेशन आमदार संजय पुराम यांच्यासाठी राजकीय कसोटीचे ठरणार आहे. मतदारसंघातील १० महत्त्वाच्या प्रश्नांवर ठोस निर्णय, कालबद्ध कृती कार्यक्रम आणि अर्थसंकल्पातून निधी मिळिवण्याची खरी परीक्षा त्यांच्यावर आहे.

आमगाव नगर परिषद निर्मितीचा प्रस्ताव दशकभर फायलींच्या भूलभुलैय्यात फिरतो आहे. सात गावांना शहरी विकासाचा लाभ मिळावा, यासाठी तातडीची अधिसूचना काढणे अत्यावश्यक आहे. मंजुरी मिळूनही वाघनदी पुलाचे काम सुरू झाले नाही. महामार्ग ३३५ वरील वाहतुकीचे दैनंदिन हाल संपवण्यासाठी कामाची निश्चित तारीख सभागृहात जाहीर व्हावी. २५ कोटींचा निधी असूनही कामात दिरंगाई का ? याचा जाब विचारणे महत्त्वाचे आहे. किडंगीपार व बाह्मणी रेल्वे फाटकावर रोज वाहतूक कोंडी होते. राष्ट्रीय महामार्ग ५४३ वरील उड्डाणपुलांना तातडीने मंजुरी मिळवणे मतदारसंघासाठी आवश्यक आहे. १९९८ पासूनची बनगाव पाणीपुरवठा योजना ठप्प आहे. ही योजना वारंवार गळती, दुरुस्तीचा अभाव आणि अपुऱ्या निधीमुळे सध्या १३ नोव्हेंबरपासून बंद आहे. नवीन प्रस्तावासह विशेष दुरुस्ती निधी मंजुरीची वेळ आली आहे. त्यामुळे हजारो नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटेल.

# आरोग्य सचिव डॉ.निपुण विनायक यांची गोंदियात आरोग्य कार्यशाळा

## गावपातळीवर सक्षम व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यावर भर

**गोंदिया :–** राज्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक तसेच अवर सचिव संजय डगले यांच्या उपस्थितीत बुधवारी मयुर लॉन, गोंदिया येथे आरोग्य विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत जिल्ह्यातील सर्वस्तरीय आरोग्य पथकांसोबत थेट संवाद साधत त्यांनी आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरूगानंथम, शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे, तसेच विविध विभागाचे अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक आणि आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यशाळेत आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा**

डॉ. विनायक यांनी गाव–पातळीवरील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक–सेविका




आणि इतर कर्मचाऱ्यांसोबत संवाद साधत खालील सूचनांवर विशेष भर दिला. गर्भवती माता, बालके, किशोरवयीन, ज्येष्ठ नागरिक यांची नियमित आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह, मुख–दंत, नेत्र तपासणी यांसारख्या मूलभूत सेवांचे गावातच उपलब्धता, लसीकरण, मानसिक आरोग्य समुपदेशन, संतुलित आहार आणि योगा याबद्दल जागृती करावी अशा सूचना दिल्या. गावपातळीवरील आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी ग्रामसभा, आरोग्य समित्या आणि जनजागृती अभियान यांचा प्रभावी वापर करावा.

**आयुष्मान आरोग्य मंदिर सेवांचा आढावा**

सद्यस्थितीत आयुष्मान आरोग्य मंदिरांमार्फत देण्यात येणाऱ्या तेरा प्रकारच्या आरोग्य सेवांची माहिती, तसेच सेवा वितरणा–तील अडचणी व सुधारणा उपाय याबाबत डॉ. विनायक यांनी प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली. गुणवत्तापूर्ण आणि तत्पर आरोग्य सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हेच या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

**जिल्हा आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्याचा संकल्प**

कार्यशाळेदरम्यान आरोग्य सुविधा, रुग्णालयीन सेवा, पायाभूत सोयी–सुविधा तसेच समुदाय आरोग्य प्रणाली मजबूत करण्यावर व्यापक चर्चा झाली. आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उत्साहाने उपस्थित राहिल्याने जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा अधिक परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.